साप्ताहिक
चतुरस्त्र | परखड | रास्त | कर्तव्यदक्ष
# चपराक
• वर्ष : १८
• अंक : १५
• पाने : १२
पुणे
मूल्य ६/-
www.chaprak.com
भ्रमणध्वनी : ७०५७२९२०९२

'Industrial Efficiency Award' Winner
■ Pioneer in continuous vacuum pans
■ Manufacturer & supplier of turn-key boiling house
■ Refined sugar plants
For More Details Contact
INDIANA SUCRO-TECH (PUNE) PVT. LTD.

Madhav Chambers-1, Flat No. 7-8, Above Dena Bank, SB Road, Pune-411016.
WORKS : G-52. MIDC Ahilyanagar, 414111. Laxmi Industrial estate, Hatkangale, 416109.
Tel.: 020-25660872 Fax: 020-25662593
Email : istppl1@gmail.com/ www.istppl.in

■ सोमवार, दि. १ ते ७ जून २०२६
संपादक : घनश्याम पाटील | कार्यकारी संपादक : प्रमोद येवले
RNI No. MAHMAR/2011/35979



# बहुआयामी भाऊ

**एखादं बी जमिनीत रोवलं गेलं की, त्याचा डौलदार वृक्ष होण्यासाठी त्याला काय काय सहन करावं लागतं? आधी स्वतःला जमिनीखाली गाडून घेणं, मग हळूहळू जमिनीतून बाहेर येणं, उन, पाऊस, वारा, आजूबाजूची जनावरं अशा कशालाही न जुमानता वाढत राहणं... त्यातूनच ते फुलतं, बहरतं, मधुर फळं देतं, अनेकांना सावली देतं! अनेक पक्षी त्यावर घरटी बांधतात. भलीभली वादळं तो वृक्ष सहजपणे पचवतो. त्याचं कारण म्हणजे त्याची मुळं घट्टपणे जमिनीखाली रोवलेली असतात. अनेक उन्हाळे, पावसाळे त्याने पचवलेले असतात.**

ज्ञानेश्वरभाऊ तापकीर यांच्यासारख्या माणसांचंही असंच असतं. त्यांचा मानसन्मान, प्रसिद्धी, यश सगळ्यांना भुरळ घालतं. त्यासाठी त्यांनी काय काय सहन केलं असावं याचा अंदाज बांधणं मात्र भल्याभल्यांना शक्य होत नाही. अशा लोकांचं वैभव, यश, त्यांचा गौरव हा वरवरचा भाग असतो पण त्यांनी आदर्शांची, संस्कारांची जी भरभक्कम पेरणी केलेली असते, कठोर परिश्रमाने, जिद्दीने जे घाव सहन केलेले असतात आणि त्यातून त्यांची मुळे ज्या दृढपणे खोलवर गेलेली असतात, अनेकांच्या आयुष्यात आनंदाची, सुखाची पेरणी झालेली असते ते खरे त्यांच्या यशस्वीतेचे गमक असते.

पुणे महानगरपालिकेचे कर्मचारी ते औंध-बाणेर भागाचे पहिले नगरसेवक हा त्यांचा प्रवास विस्मयकारक आहे. काही जण म्हणतील केवळ 'नगरसेवक' पदात यशाचं मूल्यमापन कसं करायचं? वरकरणी त्यांचा हा प्रश्न खरा असला तरी 'ज्ञानेश्वरभाऊ तापकीर' हे एक अजब रसायन आहे. त्यांनी असंख्य माणसं उभी केलीत, अनेकांना रोजगार दिलाय, अनेक कुटुंबाचे ते पोशिंदे झाले. गगनगिरी महाराजांवर त्यांची निस्सिम श्रद्धा! याच श्रद्धेतून महाराज त्यांच्याकडे आले. त्यांनीच 'योगीराज' हे नाव सुचवलं आणि त्यांना एक पतसंस्था सुरू करायला लावली. या पतसंस्थेची उलाढाल आता एका बँकेपेक्षाही जास्त म्हणजे साडेचारशे कोटीवर गेलीय. भाऊ इतक्यावरच थांबले नाहीत तर 'जोडोनिया धन उत्तम विचारे, उदास विचारे वेच करी' या तुकाराम महाराजांच्या वचनाप्रमाणे त्यांनी वेगवेगळ्या क्षेत्रात स्वतःला सिद्ध केलं. ते करताना समाजातील रंजल्या-गांजलेल्यांच्या पाठिशी ते ठामपणे उभे राहिले. ज्येष्ठ नागरिकांना, गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देणे असेल, प्रकाश आमटेंच्या संस्थेपासून ते नाना पाटेकर-मकरंद अनासपुरेंच्या 'नाम फाऊंडेशन'पर्यंत आणि आमच्या लातूरच्या रवी बापटलेंच्या 'सेवालय'पासून ते अनेक खेळाडू-कीर्तनकारांपर्यंत प्रत्येकाच्या पाठीशी ते राहिले.

सहकार, शिक्षण, आरोग्य, समाजकारण, साहित्य, संस्कृती, क्रीडा अशा सर्व क्षेत्रात त्यांनी अनेकांना मदतीचा हात दिलाय. त्यांचं व्यक्तिमत्त्व बहुआयामी आहे. संपर्कात आलेल्या प्रत्येकाला काही ना काही लाभ कसा होईल आणि त्याला आपल्यापरीने काय मदत करता येईल हे त्यांनी पाहिले. औंध, बाणेर, बालेवाडी, हिंजवडी, पाषाण हा भाग उच्चभ्रुंचा म्हणून ओळखला जातो. इकडे अनेक 'लक्ष्मीपुत्र' आहेत. भाऊंनी या भागात साहित्य संमेलने भरवली. काव्य स्पर्धा, नाट्य स्पर्धांना उत्तेजन दिले. 'चपराक परिवारा'चे सल्लागार या नात्याने त्यांनी या भागात 'चपराक'चे जाळे विस्तारले. दिवाळीला प्रत्येकाला 'साहित्य चपराक' मासिकाचा दिवाळी अंक भेट देऊन 'अक्षरदिवाळी' साजरी करणारे भाऊ, वर्षभर कोणत्याही निमित्ताने कोणीही संस्थेत आले तर त्यांचे स्वागत करताना 'बुके ऐवजी बुक' ही संकल्पना प्रत्यक्षात आणणारे भाऊ हे खऱ्या अर्थी माय मराठीचे पुत्र आहेत.



**संपादकीय**
**घनश्याम पाटील ७०५७२९२०९२**

'लाख बोलक्याहूनि थोर, एकचि माझा कर्तबगार' असं राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणायचे. ज्ञानेश्वरभाऊ तापकीर असेच कर्तबगार आहेत. प्रत्येकाच्या सुख-दुःखात सहभागी होतानाच समोरच्याचं दुःख समजून घेण्याची त्यांची क्षमता अफाट आहे. एखाद्याची अपघातात डोक्याची कवटी फुटलेली असताना, तो वाचण्याची मुळीच शक्यता नसताना त्याला तात्काळ हवा तितका निधी उपलब्ध करून देऊन मृत्युच्या दाढेतून बाहेर आणण्याची जिगर त्यांच्यात आहे. म्हणूनच आज दुबईपासून सिंगापूरपर्यंत योगीराजचे ठेवीदार आहेत. सहकारात 'स्वार्थ' बोकाळलेला असताना असा 'स्व-अर्थ' उमगलेले भाऊंसारखे व्यक्तिमत्त्व विरळच! भाऊ आजही रोज रानात जातात. कष्ट करणे हा त्यांच्या स्वभाववृत्तीचा भाग आहे. कठोर परिश्रमाशिवाय काहीही मिळत नसतं, याची त्यांना जाणीव आहे. त्यामुळे ते स्वतः अत्यंत मेहनत घेतात. 'कसं टाळू?' आणि 'कष्ट टाळू' वृत्तीच्या माणसांना दूर करत 'कष्टाळू' माणसांच्या पाठिशी ते उभे राहतात. आईवडिलांचे संस्कार, गगनगिरी महाराजांचे आशीर्वाद आणि सहकारी, कर्मचाऱ्यांची साथ यामुळे त्यांनी उत्तुंग भरारी घेतली आहे. ते कुटुंबवत्सल आहेत. सामान्य माणसाविषयी त्यांच्या मनात कळवळा आहे. प्रत्येकाचे भलेच व्हावे, असा व्यापक, उदात्त विचार ते करतात आणि त्या दृष्टिने जे काही करता येईल ते करतात. सामान्य माणूस नेहमीच त्यांच्या केंद्रस्थानी राहिला आहे. त्यामुळे राजकारण पूर्णपणे सोडून देऊन त्यांनी समाजकारणाचा वसा स्वीकारला. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यापासून ते अजितदादा पवार, चंद्रकांतदादा पाटील असे सर्व जण योगीराजमध्ये येऊन गेले. प्रकाश आमटे, नाना पाटेकर असे मान्यवर भाऊंचे मित्र झाले. देशाच्या राष्ट्रपती राहिलेल्या प्रतिभाताई पाटील योगीराजच्या व्यासपीठावर आल्या. अनेक प्रशासकीय अधिकारी जोडले गेले. त्यांच्या कीर्तीचा सुगंध सर्वत्र दरवळत गेला. ज्ञानेश्वरभाऊ तापकीर येत्या ४ जूनला बहाहत्तराव्या वर्षात पदार्पण करत आहेत. त्यांना उदंड, निरोगी दीर्घायुष्य लाभावे, त्यांच्या हातून सामान्यांची अशीच सेवा घडावी, हीच प्रभू श्रीरामचरणी प्रार्थना करतो.





**दिलीप फलटणकर**
लेखक आणि पत्रकार
: ९८८१४१९७९६



# एक आनंदयात्री

**राजकारण, समाजकारण, शेती आणि योगीराज पतसंस्थेचे प्रशासन आणि सामान्य माणसाला आपले वाटणारे ज्ञानेश्वर तापकीर उर्फ सर्वांचे 'भाऊ' ७२व्या वर्षात पदार्पण करत आहेत. त्यानिमित्त दिलीप फलटणकर यांचा लेख.**

**ह्या नभाने या भूईला दान द्यावे**
**आणि ह्या मातीतून चैतन्य गावे**

या कवी ना. धों. महानोर यांच्या ओळीप्रमाणे औंध, बाणेर, बालेवाडीचे एक लाडके व्यक्तिमत्त्व म्हणजे योगीराज नागरी सहकारी पतसंस्था, बाणेरचे संस्थापक अध्यक्ष ज्ञानेश्वरभाऊ तापकीर.

जीवन जगत असताना आपल्याला वेगवेगळ्या प्रकारची माणसे भेटत असतात. काही विसरून जातात तर काही माणसे काळजात घर करून राहतात. अशा माणसांना विसरावं म्हटलं तरी विसरत नाहीत कारण ती सुगंधासारखी प्रत्येक श्वासाबरोबर दरवळत राहतात. भाऊ हे एक असंच प्रेमळ आणि मनमिळाऊ व्यक्तिमत्त्व. अशा नितळ मनाच्या माणसास राष्ट्रीय सहकार विकास महामंडळाचा आणि इतर अनेक पुरस्कार मिळाले. त्यामुळे त्या पुरस्कारांचीही उंची वाढली.

गगनगिरी महाराज हे महाराष्ट्रातील अत्यंत प्रसिद्ध संत, योगी आणि सिद्धपुरूष म्हणून ओळखले जातात. अध्यात्म, योगसाधना आणि कठोर तपश्‍चर्या यांच्या बळावर त्यांनी लाखो भक्तांच्या मनात श्रद्धेचे स्थान निर्माण केले. त्यांचे व्यक्तिमत्त्व साधेपणा आणि लोककल्याणाच्या भावनेने परिपूर्ण होते. भाऊंना त्यांचा सहवास लाभला आणि २६ मे १९९६ रोजी गगनगिरी महाराजांच्या हस्ते योगीराज पतसंस्थेची स्थापना झाली. या उद्घाटन प्रसंगाचा मी एक साक्षीदार आहे, हे मी माझे भाग्य समजतो. आज डीपी रोडवरील भाग्यश्री चेंबर्समधील योगीराज नागरी सहकारी पतसंस्थेचे कार्यालय एखाद्या कार्पोरेट ऑफिससारखे वाटत असले तरी त्या कार्यालयाचा चेहरा-मोहरा, रूप, गंध आणि भावनाही एखाद्या मंदिरासारख्या आहेत. त्याचे कारण ज्ञानेश्वर तापकीर यांनी जपलेल्या, श्री गगनगिरी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या पतसंस्थेचे पावित्र्य आहे. भाऊंच्या गोड शब्दांचे स्वागत आणि व्यवस्थापक श्री. दत्तात्रेय गंगणे सरांची नम्र भाषा गगनगिरी महाराजांना सांगत असते -

**चालो वाटे आम्ही तुझाचि आधार**
**चालविसी भार सवे माझा.**

मग तो पतपेढीचा सभासद असो किंवा सामान्य माणूस त्यांना हाच अनुभव येतो. योगीराज नागरी सहकारी पतसंस्था ही फक्त संस्था नाही तर प्रत्येकाच्या घराचा ती आधार झाली आहे. घरातील मुलांना उच्च शिक्षणासाठी, गरिबांच्या हृदय आणि किडनी प्रत्यारोपणासाठी मदत, ज्या गरीब मुलीला आई-वडील नाहीत त्यांना योगीराज कन्यारत्न मदत, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांसाठी नाम फाउंडेशनला मदत, हेमलकसा येथील डॉ. प्रकाश बाबा आमटे यांच्या लोकबिरादरी प्रकल्पाला मदत, साहित्य संमेलन असेल, भंडारा डोंगरावरील संत शिरोमणी तुकाराम महाराजांच्या मंदिराच्या बांधकामाला केलेली मदत असे कार्य त्यांनी केले आहे, अद्याप करत आहेत. त्यातून अनेकांची घरे, उद्योग उभे करण्याचे पुण्य या संस्थेने घेतले आहे.

योगीराजच्या स्थापनेला नुकतेच ३० वर्षे पूर्ण झाली. तीस वर्षांत ज्ञानेश्वरभाऊ तापकीर आणि त्यांचे सर्व सहकारी यांच्यामुळे त्याचा आज वटवृक्ष झाला आहे. त्या वटवृक्षाच्या सावलीत बारा हजार तीनशे सभासद विसावले आहेत. तीस वर्षांपूर्वी ही पतसंस्था स्थापन झाली तेव्हा औंध, बाणेर, बालेवाडी ही सुंदर, देखणी खेडी होती. पाठीशी तुकाईचा देवीचा डोंगर आणि तिन्ही गावांना कुशीत घेऊन वाहणारी मुळा नदी. ही पेरू आणि बोरांसाठी प्रसिद्ध गावे होती. आता तीस वर्षांत ही तिन्ही उपनगरे इतकी बदलली की गावाचे गावपण संपले. आज पुणे शहरात राहण्यासाठी सर्वात सुंदर, शांत, झोपडपट्टी नसलेला, सर्व सुविधा असणारी ही उपनगरे झाली आहेत. मुंबई-बेंगळुरू महामार्ग आणि श्री छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल यांनी समृद्धी आली. या भागात शिक्षणाच्या उत्तम सुविधा वाढल्या. रोजगार मिळू लागला. मोठी रूग्णालये झाली. बस, मेट्रोसारख्या सुविधा दळणवळणासाठी उपलब्ध झाल्या. या फायद्याबरोबर वाहतुकीची गर्दी, प्रदूषण, महागाई, सिमेंटचे जंगल उभे राहिले आणि गावचे गावपण हरवले.

अशा बदललेल्या वातावरणात दर गुरूवारी, सोमवारी टाळ, मृदंगाचा आणि भजनाचा स्वर कानी पडतो. अशा बदललेल्या परिस्थितीत ज्ञानेश्वर तापकीर या भागाचे प्रथम नगरसेवक झाले. ज्या गावाच्या अंगाखांद्यावर भाऊ मोठे झाले त्या मातीची मनापासून सेवा केली. एकदा एका पावसाळ्यात खूप पाऊस झाला. घराघरात पाणी शिरले. त्यावेळी एका बंगल्यात अडकलेल्या वृद्ध महिलेला खांद्यावर घेऊन सुरक्षित ठिकाणी नेले, असे अनेक प्रसंग सांगता येतील. कित्येक सोसायट्यांना रस्ते आणि पाणी दिले. असंख्य लोकांना जोडले. भाऊंचा प्रचंड लोकसंग्रह हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच वैशिष्ट्यपूर्ण भाग आहे. म्हणून आज या पतसंस्थेच्या दोन शाखा झाल्या. पतपेढीकडे १६२ कोटींच्या ठेवी आहेत. सन २०२५-२६ चा निव्वळ नफा चार कोटी ५५ लाख रूपये आहे. त्या साडेचार कोटींच्या नफ्यापेक्षा भाऊंच्या काळजाच्या कुपित जपलेल्या माणसांचा गोतावळा मोठा आहे. ही खरी माणसाच्या सुशिक्षितपणाची साक्ष असते. प्रकाश बाबा आमटे आणि जगण्याचे व भोजनाचे मंत्र देणारे डॉ. जगन्नाथ दीक्षित त्यांच्या प्रेमात पडतात, हे भाग्य फार कमी लोकांच्या वाट्याला येते. मान्यवर, प्रतिभावंत, ज्ञानवंत, गुरूजन यांनी त्यांच्या जिव्हाळ्याचा अनुभव घेतला आहे.

'भाऊ' फार काळ राजकारणात रमले नाहीत, कारण आई-वडिलांचे संस्कार सांगत होते, 'समाजकारण' करा. भाऊंचे कुटुंब मोठे. आई मुक्ताआई, वडील केशवराव तापकीर. माळकरी. शांत आणि सात्विक स्वभावाचे. नम्र, विनयशील वाणी, मनमिळाऊ. त्यांच्या जगण्यात ऊसाचा गोडवा भरलेला. पाच भाऊ आणि दोन बहिणी. बारा पुतणे. समाजासाठी हे एक आदर्श कुटुंब आहे.

जो विश्‍वास समाजाने दिला त्याची आज भाऊ परतफेड करीत आहेत. आंबेडकर झोपडपट्टीतल्या एका मुलीला बारावीला ९८ टक्के गुण मिळाले. आई लोकांची धुणी-भांडी करून मुलींना शिकवत होती. तिने रात्री बारा ते चार या वेळेत अभ्यास करून यश मिळवले. भाऊंनी तिचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार केला आणि तिच्या संपूर्ण शिक्षणाच्या खर्चाची जबाबदारी घेतली. त्यावेळी भाऊंच्या आणि त्या मुलीच्या डोळ्यातील अश्रू थांबत नव्हते. अशा अनेक मुलींना भाऊंनी सहकार्य केले आहे. अशा अनेक माणसांच्या आयुष्यात प्रकाश देण्याचे काम भाऊंनी केले आहे. यात त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचे मोलाचे योगदान आहे.



असे यशाचे आभाळ हाती आले म्हणून त्यांच्या धरणीवरील अवधान कधी सुटले नाही. अडल्या-नडल्यांचे, अशिक्षितांचे, सुशिक्षितांचे ते कैवारी झाले. त्यांनी दातृत्वाचा वसा कधी सोडला नाही. योगीराज ना. सह. पतसंस्था, बाणेर हे एक कुटुंब आहे. दोन्ही बँकेत पन्नास कर्मचारी आहेत. भाऊंनी रक्ताच्या नात्याइतकेच त्या बँकेतील कर्मचाऱ्यांशी नाते जोडले आहे. भाऊ माणूस घडविणारे एक चालते बोलते विद्यापीठ आहे. त्यांनी आई-वडिलांकडून मिळालेला वारसा पुढील पिढीकडे दिला आहे. या पतसंस्थेत स्त्री वर्गाचे मोठे योगदान आहे. संस्थेच्या वैभवशाली यशात त्यांचा मोठा वाटा आहे.

भाऊंना अनेक पुरस्कार मिळाले आहेत, याचा आनंद आहे. या पतपेढीचा वृक्ष बहुअंगांनी बहरला आहे. आज भाऊ ७१ वर्षे पूर्ण करून बाहत्तराव्या वर्षात पदार्पण करत आहेत. त्यांना आपल्या 'चपराक'च्या सर्व वाचकांतर्फे शुभेच्छा देतो.

'चपराक' हे साप्ताहिक मालक, मुद्रक व प्रकाशक घनश्याम वसंतराव पाटील यांनी दै. सामना प्रेस सिंहगड रोड, वडगाव खुर्द, पुणे ४११०४१ येथे छापून चपराक प्रकाशन, ४०२, चौथा मजला, वेलस्प्रिंग, बावधन मार्केट यार्ड, बावधन बुद्रुक, पुणे ४११०२१ येथे प्रसिद्ध केले. संपादक : घनश्याम वसंतराव पाटील. (अंकातील मजकुराशी संपादक कदाचित सहमत असतीलही; वाद-विवाद पुणे न्यायालयीन कक्षेत.) भ्रमणध्वनी : ७०५७२९२०९२/८७६७९४१८५०. ई मेल : info@chaprak.com



**रवी घाटे**
राष्ट्रीय युवा पुरस्कार
विजेता २००५-०६
माजी संचालक, यो.प.
९८२२५२२३३३

# सकल जनांसी आधारू!

**शब्द संभाले बोलिए । शब्द के न हाथ न पाव ।**
**एक शब्द करें औषधी । दूजा करें घाव ।।**

संत कबीराच्या या दोह्यामध्ये माणसातील संवाद कौशल्याचं गुपित सामावलेलं आहे. आपल्या वाणीतून व्यक्त होणाऱ्या भावना या शब्दरूपात असतात. शब्दांतून माणसे जोडलीही जातात आणि शब्दांतूनच माणसा-माणसात दरीही निर्माण केली जाते. या दोह्याचा आपल्या जीवनात सातत्याने अंगीकार करणारे आपल्या बाणेर गावातील व्यक्तिमत्त्व म्हणजे आदरणीय भाऊ... श्रीयुत ज्ञानेश्वर तापकीर. आज वयाची ७१ री साजरी करत असताना भाऊंचा परिचय झाल्यापासूनच्या सर्व घटना डोळ्यासमोर तरळताहेत. या घटना फक्त घटनेच्या स्वरूपात न सांगता त्यातून बोधप्रद असे काही वेचून मी आपल्यासमोर ठेवत आहे.

## ऋणानुबंध

त्या काळात नव्यानेच विकसित होत असलेल्या औंध-बाणेर भागात भाऊंचा परिचय १९९२ साली पंचायत समितीच्या निवडणुकी दरम्यान झाला. त्या निवडणुकीमध्ये मी एक कार्यकर्ता म्हणून अशोकराव मुरकुटे यांचा दर्शनपार्क, विधाते-मुरकुटे वस्ती इत्यादी भागात प्रचार केला. बाणेर गावचे पोलीस पाटील स्व. ज्ञानेश्वर मुरकुटे (अण्णा उर्फ माउली) यांच्यासोबत माझे वडील स्व. लक्ष्मणराव घाटे यांचे मैत्रीचे संबंध होते. हे दोघेही माउलींचे चांगले मित्र होते. यातूनच परिचय होऊन मी आदरणीय भाऊंच्या जास्त संपर्कात येऊ लागलो. त्यातून जवळीक निर्माण होऊ लागली. १९९६ साली भाऊंनी योगीराज सहकारी पतसंस्थेची स्थापना केली. अध्यक्षपदाची जबाबदारी श्री. राजेश विधाते यांच्याकडे व माझ्याकडे उपाध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आली. संस्थेच्या माध्यमातून भाऊंच्या स्वभावाचे अनेक पैलू अनुभवता आले.

## गोडवा

भाऊंच्या व्यक्तिमत्त्वातील अनेक पैलूंपैकी एक म्हणजे गोडवा अथवा जिव्हाळा. 'जे जे भेटीजे भूत, ते ते मानिजे भगवंत' या संतवचनाप्रमाणे भाऊ वागत असतात. जो जो व्यक्ती त्यांच्या संपर्कात येईल, तो तो व्यक्ती भाऊंचा होऊन जाईल. काम असो वा नसो, ओळख असो वा नसो, भेटणारा प्रत्येक जण भाऊंचा होऊन जातो. याचे कारण म्हणजे भाऊंच्या वाणीत असलेला गोडवा, वागणुकीत असलेला जिव्हाळा आणि मनात असलेला उमाळा. प्रथमदर्शनी भाऊंच्या प्रेमात पडणारी असंख्य माणसे मी पाहिली आहेत, अनुभवली आहेत. भाऊंच्या लोकसंग्रहामध्ये मजुरापासून, कामगारापासून ते कारखाना मालकापर्यंत, गरिबापासून ते श्रीमंतापर्यंत, रस्त्यावर भाजी विकणाऱ्यापासून ते मोठ्या व्यावसायिक, लहानापासून थोरापर्यंत अनेक माणसे आहेत व या माणसांच्या सानिध्याने त्यांचे स्वतःचेच नव्हे तर आमचेही जीवन समृद्ध झाले आहे.

## पाठिंबा

मला २००६-०७ साली देशाचे लाडके राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या हस्ते 'राष्ट्रीय युवा पुरस्काराने' गौरविण्यात आले होते. देशातील २५ सर्वोत्तम कार्य करणाऱ्या युवकांमध्ये माझा समावेश होऊन हा पुरस्कार देण्यात आला होता. 'भगवान देता है तो छप्पर फाड के देता है' या उक्तीप्रमाणे भारताचे राष्ट्रपती माझ्या गावात येऊन ३५००० युवक व नागरिकांसमोर केलेला सन्मान मी कधीच विसरणार नाही. त्यानंतर मी जगभरातील अनेक सन्मान मिळवले. अगदी अमेरिकेतील सिलीकॉन व्हॅलीतही सपत्नीक जाऊन आलो; पण या सर्वांमागील प्रेरणा कोण होती याचा अभ्यास जर केला; तर भाऊंचे नाव प्रामुख्याने घेता येईल. भाऊंनी आम्हा सर्वांना सहकारात आणून वक्तृत्वकौशल्य संपन्न बनविले, सामाजिक काम करण्याची उर्मी दिली. त्यातूनच माझ्यासारखा एक कार्यकर्ता नावलौकिकास आला असे मला वाटते.



## विश्वास

भाऊंच्या वागणुकीमुळे लोकांचा त्यांच्यावर प्रचंड विश्वास बसतो. म्हणजे योगीराजचा आताचा जो आलेख साडेचारशे कोटींच्या वर गेलेला आहे त्याचा पाया भाऊंच्या विश्वसनीय वागणुकीत व कमावलेल्या लोकांच्या विश्वासावर आहे. त्यांच्यासोबत असलेल्या इतर संचालकांनीही त्यांच्या पावलावर पाऊल टाकत जनसामान्यांचा विश्वास संपादन करून भाऊंच्या या कार्यात मोलाचा वाटा उचलला आहे. याचे उदाहरण द्यायचे झाले तर एखाद्याकडे समजा १० लाख रुपये असतील तर तो किमान ७ ते ८ लाख रुपये 'योगीराज' मध्ये भाऊंच्या विश्वासावर गुंतवतो. किंबहुना मी अशी अनेक लोक पाहिली आहेत की मिळालेली सर्वच्या सर्व रक्कम ते 'योगीराज'मध्ये गुंतवतात... कारण एकच... भाऊंवर ठेवलेला अखंड विश्वास व विश्वासास पूर्णपणे पात्र झालेली भाऊंची योगीराज पतसंस्था.

## नेतृत्व

भाऊंनी बाणेर-बालेवाडी भागाचं पहिलं नगरसेवकपद भूषविलं. आपण अनेक नगरसेवक पाहतो. त्यांच्यात निवडून आल्यानंतर सत्तेची गुर्मी येते. 'मी म्हणेल तसेच झाले पाहिजे' हा माज येतो; परंतु भाऊंच्या पूर्ण कार्यकाळात असा कुठलाही प्रकार मतदारसंघातील नागरिकांना अनुभवायला मिळाला नाही. या उपरोक्त अतिशय प्रेमपूर्ण व मवाळ पद्धतीने नागरिकांशी भाऊ विचारमंथन करीत व त्यांचे प्रश्न सोडवत असत. 'नेतृत्व कसे असावे तर भाऊंसारखे' असे आजही, म्हणजे भाऊंचा कार्यकाळ संपल्याच्या २० वर्षांनीदेखील लोक आपआपसात बोलत असतात. हीच भाऊंच्या नेतृत्वाची व चांगुलपणाची पोचपावती आहे, असे मी मानतो. त्यांच्या कार्यकाळातच बाणेर-बालेवाडीचा विकास होऊन गावापासून त्याची वाटचाल पुणे शहरातील सर्वांत संपन्न भागात झाली. आज बाणेर-बालेवाडीला राहतो म्हणजे त्या व्यक्तिचे आर्थिक स्टेटस खूप मोठे आहे असे मानले जाते. हा भाग सर्वोत्तम करण्यात भाऊंचा सिंहाचा वाटा आहे.

## निष्ठा

भाऊंना आम्ही सर्व गुरू मानतो; पण भाऊ ज्यांना गुरू मानतात अशा माजी खासदार नानासाहेब नवले, माजी खा. अशोकरावजी मोहोळ या नेत्यांचेही भाऊंवर अतिशय प्रेम. ज्यावेळेस राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना करण्याचे पवार साहेबांनी ठरविले, त्यावेळेस वरील नेत्यांनी भाऊंना घरी बोलावून घेऊन आपल्या आगामी वाटचालीविषयी चर्चा व सल्लामसलत केली होती. अशोकअण्णांच्या मनात होत असलेली 'काँग्रेस सोडावी लागेल' ही उलाढाल अस्वस्थ करणारी होती. तीच अस्वस्थता आदरणीय नानासाहेबांच्या मनात होती. त्यावेळी भाऊंच्या निर्णयामध्ये जो 'विश्वास' दाखवला, त्यामुळेच 'नेता-कार्यकर्ता' हा बंध अधिक दृढ झाला. शेवटी त्या तिन्ही नेत्यांनी काँग्रेसमधूनच कार्य करण्याचे ठरविले. या सर्व घटनाक्रमाचा साक्षीदार होण्याचे भाग्य आम्हाला लाभले.

भाऊंनी कधी 'काँग्रेस' सोडली नाही व मी कधी भाऊंना सोडले नाही; परंतु मी काँग्रेसमध्ये कधीही गेलो नाही. आम्हा सर्वांना भाऊंनी जो निर्णय घेतला तो मान्य असायचा... कारण आमचे नाते प्रेमाचे होते व विश्वासाचे होते.

भाऊंना ज्यावेळेस काँग्रेसने तिकीट नाकारले त्यावेळेस आम्ही सर्व दुःखी झालो कारण एवढे उत्तम कार्य करणारा नगरसेवक जर काँग्रेस नाकारत असेल तर काँग्रेस नक्कीच किमान आपल्या भागात तरी बुडणार, याचे भान आम्हा सर्वांना होते आणि घडलेही तसेच. ज्यावेळेस काँग्रेसने पुन्हा भाऊंना तिकीट दिले, त्यावेळेस भाऊंनी ते नाकारायला हवे होते असे आजही आम्हा सर्वांना वाटते. 'काँग्रेसच्या अधःपतनास केवळ काँग्रेसच जबाबदार राहील' हे ज्येष्ठ गांधीवादी नेते मा. बाळासाहेब भारदे यांनी १९८० मध्ये नमूद केले होते. आम्हा सर्वांना काँग्रेसच्या नेतृत्वातील धरसोड वृत्ती व त्यातून पक्षाचा होणारा ऱ्हास आपल्या भागात अनुभवास आला होता.

## कुटुंबवत्सलता

भाऊ सामाजिक जीवनाबरोबरच वैयक्तिक आयुष्यातही खूप हळवे आहेत, भावनिक आहेत. आपल्या नातीच्या उपचारासाठी व्यथित होणारे 'आजोबा' पाहिले तर आजही मन हेलावून जाते. भाऊंनी प्रयत्नांची पराकाष्ठा करून आपल्या नातीस पुनरुज्जीवन दिले, हे सर्व आप्तेष्टांना माहिती आहे. भाऊंच्यातील 'आजोबा' त्या कठीण काळामध्ये आम्ही सर्वांनी अनुभवला होता. भाऊंच्या दोन्ही कन्या व जावई, मुलगा गणेश व वहिनी हे अत्यंत आदर्श पद्धतीने जीवन जगणारे कुटुंब आहे. गणेशचा तर आदर्श सर्वांनी घेतला पाहिजे असा आहे. तंत्रज्ञानाच्या माध्यमातून समाजासाठी तो काही करू इच्छितो. आमच्या पंचक्रोशीतील एकमेव मुलगा की ज्याला तंत्रज्ञान लोकांपर्यंत पोहोचवायची आवड आहे, असे मी त्याचे वर्णन करतो. संपूर्ण कुटुंबाचा पाया 'जिजी' या आहेत. हे सर्व कुटुंब खऱ्याअर्थाने कुटुंबवत्सल आहे व ते केवळ भाऊंच्या संस्कारातून शक्य झाले आहे. भाऊंच्या घरी कधीही गेलेला माणूस चहा-पाणी, दूध घेतल्याशिवाय बाहेर पडलेला मला दिसला नाही. यातूनच जिजी व सूनबाईदेखील भाऊंचीच जिव्हाळ्याची परंपरा पुढे नेत आहेत, असे अनुभवयास येते. 'शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी' याचे मूर्तिमंत उदाहरण भाऊंची मुले आहेत. त्यांना सर्वोत्तम जावई लाभले आहेत.

## वारसा

भाऊंच्या जन्मदिनानिमित्त लिहिताना मला भाऊंची तुलना नामांकित वस्तादाशी करावीशी वाटते. वस्ताद जसा आपल्या पठ्ठ्या गावागावांचे मोठे आखाडे मारल्यावर खूश होतो त्याप्रमाणे भाऊ त्यांनी तयार केलेले पठ्ठे विविध क्षेत्रात जाऊन यशस्वी होताना पाहून खूश होतात. भाऊंच्या तालमीतून माझ्यासारखे अनेक कार्यकर्ते विविध क्षेत्रात काम करताहेत व नावलौकिक मिळवताहेत. काही व्यावसायिक क्षेत्रात, काही सामाजिक, काही सहकारात तर काही सांस्कृतिक क्षेत्रात नाव कमवताना दिसताहेत. या सर्व कार्यकर्त्यांच्या यशाचे श्रेय हे स्वाभाविकपणे भाऊंनाच जाते. अर्थात काही जण कृतज्ञ न राहता कृतघ्नही असतात पण ही जगाची चालरीत आहे. भाऊंनी राजकीय क्षेत्रातही आपला एखादा कार्यकर्ता तयार करून तो मोठा झालेला पाहणे मला आवश्यक वाटते; कारण अनेक मोठे नेते, की ज्यांनी आपले राजकीय वारस निर्माण केले नाहीत, (राजकीय वारस म्हणजे भाऊबंद व नातेवाईक नसलेले वारस) त्या नेत्यांचे कार्य पुढे जोमाने चालणे बंद होते, असे मी अनेक उदाहरणांनी सिद्ध करू शकतो. म्हणूनच भाऊंनी उर्वरित जीवनामध्ये एखादा लाखमोलाचा राजकीय वारस निर्माण केला तर तो भाऊंच्या यशाची पताका डौलाने समाजमनावर मिरवत राहील असा आत्म विश्वास मला आहे.

# भाऊ असावा तर असा!



चंद्रलेखा बेलसरे-जगताप, पुणे
९८५०८९५०५१



**माणूस जेव्हा जन्माला येतो तेव्हा कोणाच्या पोटी, कोणाच्या घरी, कोणत्या धर्मात, जातीत, पंथात जन्माला यायचे हा पर्याय त्याच्याकडे नसतो. ते सर्व सृष्टीच्या नियमाप्रमाणे होत असते. पुढे तो जन्माला आल्यावर त्याला जन्मदाते मिळतात. त्याचे त्यांच्याशी रक्ताचे नाते निर्माण होते. जन्माला आल्याबरोबरच आजी-आजोबा, काका-काकी, मामा-मामी, आत्या-मामा, भाऊ-बहीण मावशी-काका ही नवीन नाती निर्माण होतात. तो किंवा ती कोणाचे मुलगा किंवा मुलगी म्हणून संबोधले जातात. कोणाचे भाचा-भाची, पुतण्या-पुतणी, कोणाचे नातू-नात बनतात. ही सर्व नाती नैसर्गिकरित्या निर्माण झालेली असतात. त्यात खरंच 'चॉईस' नसतो. ती कशीही असली तरी स्वीकारावीच लागतात.**

तसेच जन्माबरोबर जात, धर्म, पंथ हे देखील त्याला येऊन चिकटतात. अगदी कायमसाठी! पुढे त्याची तीच ओळख समाजात निर्माण होते.

पण मैत्रीचे किंवा मानलेले नाते मात्र अशा रक्तसंबंधातून निर्माण होत नसतात. ते नाते प्रेम, जिव्हाळा, आपुलकी आणि आत्मीयता या भावनेतून निर्माण होतात. जीवनात असेच कोणी अलवारपणे आपल्या आयुष्यात येतात, आपल्या नकळत आपल्या मनाचा ठाव घेतात आणि आपल्या आयुष्याचा अविभाज्य भाग होऊन जातात. ते नाते जरी मानव निर्मित असले तरी ते देखील असाधारण असे असते; कारण त्या नात्यात कोणतीही अपेक्षा नसते. काही कारणासाठी कोणी जवळ येतात आणि आपुलकीच्या नात्याने आपलेसे होऊन जातात. ते नाते कधी मैत्रीचे असते तर कधी बहीण-भावाचे नाते असते. असेच माझे नाते ज्ञानेश्वर तापकीर यांच्याशी निर्माण झाले. भाऊ आमच्याच परिसरात राहणारे! तानाजी निम्हण भाऊंचे घट्ट मित्र! त्यांच्या माध्यमातून भाऊंशी ओळख झाली आणि आज वीस वर्षांपासून हे नाते कायम आहे.

खरं तर भाऊ आम्हाला एक नगरसेवक म्हणून माहीत होते. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी बाणेर-बालेवाडी परिसराचा कायापालट केला. एक कार्यक्षम नगरसेवक म्हणून भाऊंची कारकीर्द माहीत झाल्यावर त्यांच्यावरील विश्वास आणि आदर दुणावला! पण मी ज्या भागात राहत आहे, तो भाग पाषाणमध्ये येतो म्हणून काही नागरी सुविधांसाठी भाऊंकडे जाण्याचा योग आला नाही पण आमचा संबंध आला तो साहित्याच्या माध्यमातून! भाऊ स्वतः जरी साहित्यिक नसले तरी त्यांना साहित्याची प्रचंड आवड आहे. साहित्यिकांबद्दल त्यांच्या मनात खूप आदर आणि आत्मीयता आहे. त्याच शाश्वत नात्याने ते माझ्याशी, 'चपराक'चे प्रकाशक, संपादक घनश्याम पाटील यांच्याशी आणि 'चपराक टीम'शी जोडले गेले आणि त्यांची समर्थ साथ आम्हाला लाभली.

समाजात आपण बरेच असे समाजसेवक बघतो की जे समाजाच्या हितासाठी काही तरी करतो आहोत, असा भास निर्माण करतात पण प्रत्यक्ष त्यांच्याकडे कोणी कधी मदत मागितली तर मात्र ते माघार घेतात. असा देखावा करणाऱ्या समाजसेवकांची समाजात भरपूर संख्या आहे पण भाऊंसारखे सच्चे समाजसेवक मात्र विरळेच! कधी सहजच म्हणून भाऊंकडे गेले तरी भाऊ आधी विचारणार, "काही मदत हवी आहे का?" असे दातृत्व दुसरे होणे नाही.

समाजातील तळागाळातील लोकांचा भाऊ विचार करतात. अडचणीत असलेल्या व्यक्तिला त्वरीत मदत, गरीब मुलींना त्यांच्या लग्नाच्या वेळी घरगुती भांडी आणि इतर गृहोपयोगी वस्तू देणे, एखाद्या गरजू विद्यार्थ्याला मदत करणे, त्याच्या शिक्षणाचा भार उचलणे, शस्त्रक्रियेसाठी मदत करणे, देशात, राज्यात, गावात एखादी गौरवास्पद कामगिरी करणाऱ्या मुलांचा यथोचित सन्मान करुन त्यांना प्रोत्साहन देणे, साहित्यिक संस्थांना मदत करण्याच्या उद्देशाने त्यांची गुणवत्तापूर्ण पुस्तके भेट म्हणून देणे, हे भाऊंचे नित्यकर्म! काही व्यवसायिक, राजकीय किंवा वैयक्तिक स्वार्थ, उद्देश समोर न ठेवता निःस्वार्थपणे मदत करणे, हे भाऊंचे वैशिष्ट्य! असा समाजसेवकाचा वसा घेतलेला महान व्यक्ती निदान या काळात तरी माझ्या पाहण्यात आलेला नाही. त्यांच्या या उपक्रमांकडे पाहून असे वाटते की, हीच खरी समाजसेवा आहे अन् हिच खरी देशसेवा आहे. या तर झाल्या किरकोळ गोष्टी! त्याही पुढे जाऊन भाऊ 'नाम'सारख्या फाऊंडेशनला, विकास आमटे यांच्या संस्थेला लाखोंची मदत देताना मी पाहिले आहे. जेथे गरज तेथे भाऊ धावून जातात. योग्य त्या संस्थेची, माणसांची निवड करतात आणि त्यांच्या उपक्रमात सहभागी होतात. यामागे कोणताही स्वार्थ तर नसतोच पण समाजाचे देणे फेडण्याची त्यांची वृत्ती दिसून येते. आपण जे काही कमावतो, त्यात या समाजाचाही काही वाटा असतो, योगदान असते अन् ते समाजाचं देणं फेडणं हे प्रत्येक जबाबदार नागरिकाचं कर्तव्य असतं, हे भाऊ आपल्या कृतीतून दाखवून देतात. त्यांच्याकडे येणाऱ्याला ते कधीच विन्मुख परत पाठवीत नाही. त्यासाठी आधुनिक कर्ण किंवा राजा हरिशचंद्र ही उपाधी त्यांना देण्यातच सार्थकता वाटते.

भाऊंच्या व्यक्तिमत्त्वाचा आणखी एक पैलू मला याठिकाणी मुद्दामच अधोरेखित करावासा वाटतो, तो म्हणजे आपल्या काळ्या मातीत मेहनतीने उगवलेले धन-धान्य, भाजी-पाला भाऊ सर्वांना मुक्त हस्ताने वाटून टाकतात. आपल्या कर्मचाऱ्यांना प्रत्येकाच्या घरी पाठवून हा वानवळा पाठवत असतात. एवढेच नव्हे तर ते ज्या सोसायटीत राहतात त्याच्या प्रवेशद्वारावर या सर्व वस्तू टोपलीत ठेवून ज्यांना जेवढे पाहिजे तेवढे त्यांनी घेऊन जावेत, अशी योजना त्यांनी केली आहे. हे केवळ समाजाचे देणे म्हणून नाही तर सर्वांना वाटून खाण्यातच त्यांना आनंद वाटत असतो. आपल्या घासातला घास काढून देणारी ही खरंच माउली आहे. योगायोगाने त्यांचे नाव ज्ञानेश्वर आहे. एका माउलीच्या भूमिकेतून त्यांनी केलेली ही कृती खरंच अविस्मरणीय आहे, असेच म्हणावे लागेल. त्यातून त्यांची आत्मीयता, प्रेम, जिव्हाळा प्रत्ययास येत राहतो. एवढा कार्यमग्न असलेला हा माणूस असे समाजाभिमुख कार्य कसा करतो? अशा संकल्पना त्यांच्या मनात कशा येतात? त्या ते यशस्वीपणे कसे राबवतात? याचेच आश्चर्य वाटते. समाजातील एकेक रत्नांना शोधून त्यांचा गुणगौरव करणे खरं तर खूप अवघड असा टास्क आहे पण त्यांचे हे शोधकार्य सातत्याने सुरु असते. त्याच अंतर्गत ते असे महान कार्य करण्यात सिद्धता पावले आहेत, ही खरोखरच प्रशंसनीय बाब आहे. अशावेळी वाटते हा माणूस कोणत्या मुशीतून तयार झाला आहे? भाऊंचे बालपण अतिशय गरीबीत व्यतीत झालेले असताना त्यांच्यात ही उदारता कशी काय आली? कदाचित त्यांचे इष्टदैवत गगनगिरी महाराज आणि त्यांच्या आईवडिलांनी दिलेले अत्युत्तम संस्कार याचीच ती परिणीती असावी, हे खातरीने वाटते. तसेच ते त्यांच्या व्यवसायात देखील एक यशस्वी उद्योजक म्हणून ओळखले जातात. दातृत्व, कर्तृत्व, नेतृत्व ह्या तिन्ही गुणांचा एकत्रित आविष्कार, मिलाफ म्हणजेच तापकीरभाऊ! कारण त्यांचे नेतृत्व देखील तितकेच सामर्थ्यपूर्ण आहे. योगीराजच्या संपूर्ण टीमचे त्यात योगदान आहे पण ते सर्व निभावून नेण्यात भाऊंचे नेतृत्व नक्कीच कारणीभूत आहे.

त्यांच्याकडे शेतावर दुभत्या गाई आहेत. त्यांचे दूध ऑरगॅनिक हळद टाकून त्यांच्याकडे येणाऱ्यांना ते चहाऐवजी दूध देत असतात. एक हाडाचा व्यापारी असून सुद्धा आर्थिक गणित न करता आधी ते सर्वांना द्यावे आणि मग स्वतःसाठी त्याचा उपभोग घ्यावा, हे पाहून तर सोमवारच्या खुलभर दुधाची ती कहाणी आठवते. ती कहाणी खरी असेल का नाही? मला माहीत नाही पण हे ज्वलंत उदाहरण मात्र तितकेच खरे आहे, असे मला वाटते.

खरं तर भाऊंवर मी अनेक लेख लिहिले आहेत. त्यात त्यांच्या संघर्षाच्या काळापासून ते आता असलेल्या प्रगतिशील झालेल्या कार्यकाळाचा मी उहापोह केला आहे पण आज मी ते येथे मांडत नाहीय. त्याचा परामर्श त्यांच्या या गौरव पुरवणीत त्यांचे सहकारी करणारच आहेत पण त्याहीपेक्षा भाऊंच्या व्यक्तिमत्त्वाचा हा आगळा आणि वेगळा पैलु मला येथे नमूद करावासा वाटला म्हणून त्यांच्या कर्तृत्वाच्या अनेक गोष्टींना बगल देऊनही हे त्यांचे गुणवैशिष्ट्य येथे मांडत आहे.

भाऊंचे दुसरे एक गुणवैशिष्ट्य म्हणजे ते अतिशय शांत स्वभावाचे आहेत. त्यांच्याकडे येणाऱ्यांचा ते यथोचित गौरव तर करतातच आणि त्याला स्पेशल अशी वागणूक देतात. एखादा चेक जरी स्वीकारायचा असला तरी अचानक गेलेल्या माणसाच्या हस्ते ते तो चेक अथवा येणे स्वीकारतात. येणाऱ्याला क्वचितच अशी ट्रीटमेंट एखाद्या कार्यालयात मिळत असावी. सामान्यातल्या सामान्य माणसाला सुद्धा ते मान देऊन त्याला कृतकृत्य करून सोडतात. त्यांच्या तोंडात सरस्वती आहे, जीवनात लक्ष्मीचे वरदान देखील त्यांना मिळालेले आहेच पण तोंडात गोड आणि सात्विक भाषा देणाऱ्या त्या निर्मात्याचे खरंच आभार मानावेसे वाटतात की, असा माणुसकी असलेला मानव त्याने पृथ्वीवर भाऊंच्या रूपाने पाठवला आहे. ही खरंच आमच्यासाठी भाग्याची गोष्ट आहे. प्रत्यक्षात जगात आणि देशात साखर निर्मिती करणाऱ्या निर्मात्यांना जे जमले नाही, ते भाऊंनी करून दाखवले आहे. डोक्यावर थंड बर्फ ठेवून अतिशय विचारपूर्वक आणि सात्विकतेने ते कोणताही निर्णय घेतात. हे आणखी एक भाऊंचे वैशिष्ट्य! खरं तर चौफेर मुशाफिरी करणाऱ्या या व्यक्तिला इतके शांत राहून असे निर्णय घेताना पाहून तोंडात बोट घालावेसे वाटते. ही व्यक्ती डोळे उघडे ठेवून, सर्वांचा विचारच कसा करू शकते, याचेच कित्येकदा नवल वाटते. ते उत्तम प्रकारे शेती करतात, त्यांचा बांधकामासारखा रुक्ष व्यवसाय आहे, योगीराजसारख्या एका आर्थिक संस्थेचे ते संस्थापक, अध्यक्ष आहेत. ही सर्व कामगिरी करत असताना समाजाभिमुख कार्य करण्याची प्रेरणा त्यांना कुठून मिळते? त्या प्रेरणेप्रमाणे ते इतक्या कामाचा उरक कसे करतात? ही विचार करण्याची आणि त्यांच्यापासून शिकण्याची गोष्ट आहे. आदर्शवत असे त्यांचे व्यक्तिमत्त्व आहे. असाच आदर्श सर्वांनी डोळ्यासमोर ठेवून कार्य केले तर नक्कीच समाज सुखी आणि आनंदी होईल, यात शंका नाही.

कोणतीही व्यवस्थापनाची पदवी न घेता भाऊ इतके चांगले आणि उत्कृष्ट व्यवस्थापन कसे करू शकतात? हे शिकावे तर भाऊंकडूनच! त्यांच्यासमोर व्यवस्थापनाचे धडे देणारे मोठमोठे प्राध्यापक देखील कमी पडतील, इतके योग्यतापूर्ण असे त्यांचे व्यवस्थापन आहे. मला वाटते व्यवस्थापनाचे शिक्षण देणाऱ्या संस्थांनी भाऊंचे नक्कीच मार्गदर्शन घ्यावे कारण भाऊंचे हे पुस्तकी ज्ञान नसून ते प्रत्यक्ष पान ५ वर ▸▸



# योगीराजच्या आठवणीतील दादा

२८ जानेवारी २०२६ च्या सकाळी ९ वाजता जवळच्या व्यक्तिचा फोन वाजला आणि समोरून ‘‘दादा गेले’’ असे सांगताच धक्काच बसला आणि विश्वास न बसणारी बातमी ऐकून आपोआप डोळ्यातून अश्रू ओघळायला लागले. त्वरीत टीव्हीवरील बातम्या चालू केल्या आणि बाणेर येथील मी संस्थापक अध्यक्ष असलेल्या योगीराज पतसंस्थेला दादांनी दिलेल्या एक तासाच्या सदिच्छा भेटीच्या संपूर्ण आठवणी जाग्या झाल्या.

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अचानक जाण्याने संपूर्ण महाराष्ट्र दुःखसागरात बुडाला आणि कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली. दादांचा वक्तशीरपणा, कामातील शिस्त, प्रशासनावर असलेली पकड, अभ्यासू व्यक्तिमत्त्व आणि प्रत्येक क्षेत्रातील असलेला दांडगा अभ्यास असे सर्वगुणसंपन्न असलेले दादा माझे नेहमीच आदर्श होते. कुठल्याही कार्यक्रमात भेटलो की, आवर्जुन संस्था कशी चालली आहे? असे विचारणारे दादा आपल्यामध्ये नाहीत, यावर विश्वासच बसत नाही.

३० सप्टेंबर २०२४ रोजी संस्थेच्या योगीराज भूषण पुरस्कार वितरण समारंभास दादा येणार होते परंतु मला सकाळी फोन आला की, ‘‘मला अचानक मिटींग लागली आहे त्यामुळे मला संध्याकाळी होणाऱ्या कार्यक्रमास येता येणार नाही परंतु मी मुंबईला जाताना १२ वाजता संस्थेत भेट देऊन जातो.’’ दादा संस्थेत येणार म्हटल्यावर मनस्वी आनंद झाला परंतु दादा यायला अवघा १ तास शिल्लक असताना दादांच्या स्वागताची तयारी कशी करायची ही परीक्षा होती कारण दादांची शिस्त सगळ्यांना परिचित आहे. दादा आल्यानंतर त्यांना संस्था आणि संस्थेची प्रगती एवढी आवडली की, दादांनी १५ मिनिट वेळ देण्याचे कबुल केले असताना दादा चक्क १ तास थांबले. दोन सभासदांना दादांच्या हस्ते कर्ज वितरण करण्यात आले. त्याप्रसंगी दादांनी त्यांना विचारलेले प्रश्न असतील किंवा मला संस्थेबद्दलचे विचारलेले प्रश्न असतील यामुळे दादांची अभ्यासूवृत्ती आणि आपुलकी दिसली. दादांनी आम्हाला दिलेला अमूल्य वेळ कायम स्मरणात राहील आणि योगीराज पतसंस्थेच्या इतिहासात आणि माझ्या आठवणीत दादा कायम स्मरणात राहतील. दादांसारखा माणूस परत जन्माला येणे कठीण आहे. आजही मला वाटते की, कुठून तरी बातमी येईल की, दादा परत आलेत, या आशेवर महाराष्ट्रातील सर्व जनता वाट पाहत आहे.

**– ज्ञानेश्वर केशव तापकीर**
प्रथम नगरसेवक, बाणेर- बालेवाडी संस्थापक,
अध्यक्ष- योगीराज सहकारी पतसंस्था मर्या.

# मार्गदर्शक व प्रेरणास्थान

आमचे छायाछत्र आदरणीय भाऊ आपणास वाढदिवसानिमित्त प्रथमतः हार्दिक शुभेच्छा! योगीराज परिवाराचे सर्वेसर्वा, आमचे मार्गदर्शक व प्रेरणास्थान आदरणीय ज्ञानेश्वर केशवराव तापकीर तथा भाऊ यांचा वाढदिवस ४ जून.

भाऊंचा वाढदिवस म्हणजे आमच्या कुटुंब प्रमुखाचा वाढदिवस. आमच्या घरातील व्यक्तिचा वाढदिवस ज्याप्रमाणे साजरा होतो त्याहीपेक्षा अधिक आनंदाने आणि उत्साहाने आम्ही या वाढदिवसाची वाट पाहतो.

भाऊ म्हणजे अस व्यक्तिमत्त्व आहे की परिसाची उपमा दिली तरी वावगं ठरणार नाही कारण लोखंडाला परिसाचा स्पर्श झाला तर त्याचं मौल्यवान सोनं झाल्याशिवाय राहत नाही. तसं एखादा अनोळखी व्यक्ती जरी भाऊंच्या संपर्कात आला तर ती व्यक्ती आयुष्यभर भाऊंशी मित्राप्रमाणे जोडली जाते. भाऊ हे असा प्रवाह आहेत तेथे ज्ञानाचा, मानसिक आधाराचा व आपुलकीचा अखंडीत स्त्रोत आहे. ‘नाती, प्रेम, मैत्री तर सगळीकडेच असतात पण परिपूर्ण तिथेच होतात जिथे त्यांना आदर आणि आपुलकी असते...!’ ती तुमच्यामध्ये दिसून येते.



**सुरेश बोलके**
सदस्य, योगीराज परिवार

‘माणूस जन्माने नाही तर कर्माने आणि विचारांनी महान बनतो.’ मी स्वतःला एवढा नशिबवान समजतो की, आपल्यासारख्या दानशूर, प्रेमळ, दिलखुलास व्यक्तिच्या सहवासात काम करण्याची संधी मला मिळाली व तुमच्या सानिध्यात राहण्याचे भाग्य मिळाले. त्याबद्दल गगनगिरी महाराजांच्या चरणी नतमस्तक होतो. ‘नेतृत्व म्हणजे केवळ अधिकारात असणे नव्हे तर तुमच्यासोबत काम करणाऱ्या लोकांची काळजी घेणे होय.’

भाऊ, आपण योगीराज परिवाराचे नेतृत्व करत असताना आपली नैतिक मूल्ये, दुरदृष्टी व सामाजिक बांधीलकीच्या जोरावर योगीराज पतसंस्थेचा आर्थिक आलेख दरवर्षी उंचावत ठेवला असून प्रत्येक सदस्याच्या दुःखात असो वा आनंदात सहभागी होऊन एक कौटुंबिक जिव्हाळा निर्माण केलात. त्यामुळे तुम्ही आमच्या घरातीलच कुटुंबप्रमुख असल्याची जाणीव होते. भाऊ तुम्हाला या वाढदिवसानिमित्त निरोगी दीर्घायुष्यासाठी व तुमच्या संकल्पासाठी लाख लाख शुभेच्छा!

# भाऊ असावा तर असा!

◂◂ पान ४ वरून

जगले आहेत, अनुभवले आहे आणि तोच अनुभव यशस्वी होण्यासाठी आवश्यक आहे.

भाऊंचे संबंध केवळ त्यांच्या संपर्कात असलेल्या व्यक्तिशीच चांगले आहेत, असे नाही तर त्यांच्या नातेवाईक, कुटुंबाशी देखील त्यांचे तेवढेच सौहार्द्रपूर्ण संबंध आहेत. ते अतिशय कुटुंबवत्सल असे व्यक्ती आहेत आणि जी व्यक्ती आपल्या कुटुंबावर प्रेम करते, ती व्यक्ती जगावर सुद्धा प्रेम करू शकते. म्हणूनच भाऊंच्या मनात सर्वच मानव जातीबद्दल प्रेमाचा झरा अखंड वाहत आहे. भाऊंच्या सोबत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसोबत भाऊंचे जिव्हाळ्याचे संबंध आहेत. त्यांच्या व्यक्तिगत सुख-दुःखात देखील सहभागी होऊन भाऊ त्यांच्या अडचणींच्या वेळी धावून जातात, मदतीचा हात देतात. असा मालक कोणाला नको असेल? कोणतेही विधायक कार्य करायचे असो, त्याची सुरूवात आधी घरापासून करायची असते, हा एकप्रकारचा संकेत आहे कारण स्वतःचे घर दुःखी किंवा अभावग्रस्त ठेवून माणूस पुढे जाऊच शकत नाही. तिही भूमिका भाऊ अतिशय जबाबदारीने निभावतात अन् म्हणूनच ते एक आदर्श पिता आहेत, सासरे आहेत, आजोबा आहेत, एका यशस्वी दाजीचे मेहुणे आहेत, एका बहिणीचे आदर्श भाऊ आहेत आणि आम्हा सर्वांचे लाडके भाऊ आहेत. ‘भाऊ कसा असावा?’ असे जर मला कोणी विचारले तर मी म्हणेल की, ‘तो आमच्या भाऊंसारखा असावा. स्नेह जपणारा, माया करणारा, प्रसंगी मदतीला धावून येणारा, नाते वृद्धिंगत करणारा आणि एकदा का नाते जडले तर ते आयुष्यभर निभावणारा!’

भाऊंच्या कार्यालयात केव्हाही जा. भाऊ कधीच चिडलेले, वैतागलेले दिसले नाहीत. कितीही कामात असले तरी ऑफिसमध्ये आलेल्यांना ते वेळ देतात, त्यांची आत्मीयतेने विचारपूस करतात. कोणत्याही प्रसंगी भाऊंनी कोणाकडे मुद्दाम दुर्लक्ष केलेले मी कधीच पाहिले नाही. कितीही कामात व्यग्र असू देत, दोन आत्मीयतेचे शब्द ते बोलतात. तुसडेपणाने कोणाची भेट ते नाकारत नाहीत अन् म्हणूनच ते लोकांचे आवडते नेतृत्व आहे. त्यांचा जनसमुदाय प्रचंड आहे, जनसंपर्क दांडगा आहे. त्यांच्याकडे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, धनाढ्य, प्रतिष्ठित आणि समाजमान्यता असलेल्या लोकांची उठबस असली तरी तेवढीच आत्मीयता आणि आदर सामान्यजणांच्या बाबतीत देखील दिसून येतो.

त्यांच्या योगीराज पतसंस्थेच्या ठेवी दिवसेंदिवस वाढत चालल्या असून इवलासा वेलू गेला गगनावरी, अशी ह्या पतसंस्थेची घोडदौड आम्ही गेल्या काही वर्षांपासून पाहत आलोय. एक आदर्श पतसंस्था म्हणून या संस्थेला म्हणजेच भाऊंना अनेक पुरस्कार देखील मिळालेले आहेत. सर्वांना या संस्थेत विनाअडथळा मुक्त प्रवेश असतो. त्यांची अडचण समजावून घेऊन भाऊ त्यांना शक्य होईल तेवढी मदत करतात. अनेकांचे संसार, अनेकांचे जीवन त्यांच्यामुळे उभे राहिलेले आहे. अशा सर्व लोकांचे आशीर्वाद आणि शुभेच्छा भाऊंच्या पाठीशी आहेत. ४ जून रोजी भाऊ वयाच्या ७१ व्या वर्षात पदार्पण करीत आहेत. तितक्याच उत्साहाने, जोमाने आजही कार्यरत आहेत. त्यांची ही ऊर्जा केवळ लोकांचे आशीर्वाद आणि दुवा याचा परिपाक आहे. असेच आरोग्यपूर्ण उदंड आयुष्य त्यांना लाभो आणि त्यांचे कार्य अविरत चालू राहो, हीच अपेक्षा मी या ठिकाणी व्यक्त करते आणि त्यांचे अभिष्टचिंतन चिंतते. ते सर्वांचेच भाऊ आहेत. ती भूमिका तर ते योग्यरीतीने पार पाडतातच पण ते असंख्य लोकांचे माउली आहेत. मातेची भूमिका देखील ते निभावतात. असे मायेचे बंध त्यांनी बाणेर, औंध, पाषाण परिसरात निर्माण केले आहेत. त्यांचे सहकारी आणि कर्मचारी कोणत्याही कार्यक्रमाला आग्रहाने निमंत्रित करण्यास कधीच विसरत नाहीत पण स्वतः भाऊ देखील फोन करून वैयक्तिकरित्या सर्वांना व्यग्र दैनंदिनिमधून वेळ काढून निमंत्रित करतात हे त्यांच्या माणुसकीच्या स्वभावाचे प्रतीकच आहे. कोणताही कार्यक्रम असो, ते कधीच स्वतःकडे यजमानपद न घेता दुसऱ्यांना मान देतात, ती व्यक्ती त्यांच्यासाठी खास आहे, ह्याची जाणीव करून देतात, असा प्रसिद्धी परांगमुख व्यक्ती समाजासाठी एक आदर्शयुक्त व्यक्तिमत्त्व कसे असावे याचे मूर्तिमंत प्रमाण आहे. त्यांचे अनुकरण केल्यास असे अनेक आदर्श व्यक्तिमत्त्व या समाजात आपल्याला पाहायला मिळतील यात शंका नाही अन् हे काही ते जाणीवपूर्वक आणि आपली प्रतिमा उजळ करण्यासाठी करत नाहीत तर तो त्यांचा स्थायिभाव आहे, सर्वसमावेशक स्वभाव आहे. संघर्ष, दुसऱ्यांच्या समस्यांच्या जाणीव राखून, त्या व्यक्तिला स्वतःच्या ठिकाणी ठेवून ते तशी कृती करत असतात. परदुःख ते आपले समजून तसे वागतात. अर्थात आपल्या राजकीय नेत्यांसारखे त्यांच्याकडे लोकाभिमुख कामे करण्यास सरकारी खजान्यातून निधी उपलब्ध नसला तरी ते सामाजिक बांधिलकीच्या जाणीवेतून आपल्या खिशातून ही विधायक कामे करत असतात. अशाप्रकारची दानशूरता फार कमी लोकांच्या बाबतीत दिसून येते. आज कोणत्याही भाऊबीजेला किंवा रक्षाबंधनाला आम्ही त्यांना ओवाळत नसलो, राखी बांधत नसलो तरी मनात आपला रक्षणकर्ता, वेळेवर धावून येणारा श्रीकृष्णासारखा एक भाऊ आपल्या पाठीशी आहे हाच विश्वास कायम अंतरी असतो आणि तेवढा दिलासाच आम्हास पुरेसा वाटतो. म्हणूनच भाऊ असावा तर असा याचा सार्थ अनुभव पावलोपावली आम्हास येतो. जगात कोणाचा मालक होणे सोप्पे असते, कोणाचे नेतृत्व करणे, व्यावसायिक दृष्टिकोन ठेवणारे अनेक असतात पण पाठीराखा भाऊ होणे सोपे नसते पण भाऊ आज सर्वांचे भाऊ म्हणून ओळखले जातात. ही ना भूतो, ना भविष्यती अशी समीकरणे यथार्त भूतलावर साकारलेली या व्यक्तिमत्त्वातून दिसून येतात. आज वर्षानुवर्षे झाली भाऊ आमच्या उभयतांकडून दसऱ्याची तिजोरी पूजा, दिवाळीचे लक्ष्मीपूजन करून घेतात. एवढी नितांत श्रद्धा, विश्वास त्यांना आपल्या या प्रियजणांवर आहे, त्यातच सर्व काही येते. शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते, दिव्यत्वाची जेथे प्रचिती, तेथे कर माझे जुळती. आधी केले मग सांगितले, बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले ह्या उक्ती सार्थ करीत भाऊंची ही वाटचाल अशीच कायम राहो, ते माणुसकी आणि मानवता जपत राहोत, हीच शुभेच्छा!

क्षणचित्रे

# आधुनिक युगातील माउली...



**दत्तात्रेय गंगणे**
मुख्य कार्यकारी अधिकारी
योगीराज नागरी सहकारी
पतसंस्था मर्यादित, बाणेर
९४२२३४५६९४

श्री. ज्ञानेश्वर तापकीर (माउली) 'भाऊ' माझ्यासाठी एक प्रेरणा, आधार आणि माणुसकीचा चेहरा आहेत. मी आज ज्या ठिकाणी उभा आहे, जे यश संपादित करत चाललो आहे त्या प्रवासामागे जर कोणाचा सर्वात मोठा हात असेल तर तो म्हणजे आदरणीय 'भाऊ'. लोक त्यांना एका यशस्वी योगीराज सहकारी पतसंस्थेचे संस्थापक, अध्यक्ष म्हणून ओळखतात पण माझ्यासाठी ते केवळ संस्थापक नाहीत, ते मार्गदर्शक, आधारवड आणि आयुष्य घडवणारे व्यक्तिमत्त्व आहेत.

भाऊंनी शून्यातून स्वतःचे विश्व उभे केले. सुरुवातीच्या काळात पुणे महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळातील नोकरी करत केलेला शाळांमध्ये बिस्किटे वाटण्याचा व्यवसाय असेल, अथक परिश्रम, प्रामाणिकपणा आणि दूरदृष्टी यांच्या बळावर त्यांनी संस्थेची स्थापना केली आणि हजारो लोकांच्या आयुष्यात आर्थिक स्थैर्य निर्माण केले! पण एवढं यश मिळूनही त्यांच्या स्वभावातील साधेपणा आणि माणुसकी कधीच बदलली नाही. मला ते नेहमी सांगतात, गरुडासारखी झेप घ्यायची, यशाच्या उंच शिखरावर पोहोचायचे पण ज्या जमिनीवर पाय ठेवून झेप घेतली त्याला विसरायचे नाही. म्हणजेच जुने दिवस कायम लक्षात ठेवायचे.

समाजातील गरजू लोकांसाठी त्यांनी नेहमीच आपले दरवाजे खुले ठेवले. गरीब विद्यार्थ्यांचे शिक्षण, योगीराज शिष्यवृत्ती, गरीब मुलींच्या लग्नात संपूर्ण भांड्यांचा संसार देऊन योगीराज कन्यारत्न विवाह मदत योजना, गरजूंना वैद्यकीय मदत, ग्रामीण भागातील विकासकामे आणि अनेक सामाजिक कार्यांमध्ये त्यांनी दिलेला हात हा केवळ मदतीचा नव्हता तर अनेकांसाठी नवजीवन देणारा होता. हे सर्व करत असताना संस्थेच्या प्रगतीमध्ये पूर्ण बारकाईने लक्ष ठेवून दोन शाखांमध्ये केलेला २९२ कोटी रुपयांचा एकत्रित व्यवसाय, १६२ कोटी रुपयांच्या ठेवी, १३० कोटी रुपयांचे कर्जवाटप आणि ४ कोटी ५५ लाख रुपयांचा मिळालेला नफा हा फक्त आणि फक्त भाऊंच्या अधिपत्याखाली मिळाला आहे. याचे श्रेय ते संचालक आणि स्टाफला देतात पण खरे या यशाचे मानकरी भाऊ आहेत.



माझ्यासाठी भाऊ म्हणजे विश्वास. मी ज्यावेळी ३० वर्षांपूर्वी योगीराज पतसंस्थेत मुलाखतीला आलो त्यावेळी माझ्या खिशात फक्त २ रुपये होते. मुलाखतीमध्ये माझ्या तोंडातून शब्द निघत नव्हता. त्यावेळी मला त्यांनी विचारले की ''काय झाले?'' मी नम्रपणे सांगितले की, ''मी नाश्ता केलेला नव्हता व दुपारी तुम्ही सर्व जण जेवायला गेले त्यावेळी मी वडापावच्या हॉटेलमध्ये गेलो व तिथे २ रुपये ५० पैसे वडापावची किंमत असल्याने फक्त वडा खाल्ला आहे. मला तुम्ही द्याल त्या पगारात नोकरी करेल.''

हे ऐकल्यावर भाऊंनी माझी गरज आणि गरिबी पाहून नोकरी दिली आणि आजचा माझा प्रवास समृद्धी महामार्गाचा केला. असा हा माझा जाणता राजा. आयुष्यात माझ्यावर कठीण प्रसंग आले, अनेक वेळा आत्मविश्वास डळमळला पण भाऊ नेहमी माझ्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले. माझ्या मुलीच्या फिजिओथेरपी शिक्षणासाठी कॉलेजमध्ये प्रवेश मिळवून दिला नसता तर आज ती डॉक्टर झाली नसती आणि यूकेमध्ये मास्टर करून माझी मान समाजात उंचावली नसती. त्यांनी मला केवळ संधी दिली नाही तर माझ्यावर विश्वास ठेवला, मला घडवलं आणि पुढे जाण्याची ताकद दिली. आज मी संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी या पदावर कार्यरत असलो तरी या यशामागे भाऊंचे संस्कार, मार्गदर्शन आणि आशीर्वाद आहेत, याची मला सदैव जाणीव आहे आणि त्यांचे हे ऋण आयुष्यात कधीच फेडू शकणार नाही.

भाऊ आपल्या कर्मचाऱ्यांना कधीही कर्मचारी म्हणून वागवत नाहीत; ते प्रत्येकाला आपल्या कुटुंबातील सदस्य मानतात. कोणाच्याही दुःखात ते तितक्याच आत्मीयतेने सहभागी होतात. त्यांच्या एका प्रेमळ शब्दाने माणसाला नव्याने उभं राहण्याची प्रेरणा मिळते. आज लोक त्यांना आदराने 'भाऊ' म्हणतात कारण त्यांनी केवळ संस्था उभी केली नाही तर माणसं जोडली, आयुष्य घडवली आणि अनेकांच्या चेहऱ्यावर हसू आणलं.

माझ्यासाठी भाऊ हे केवळ नाव नाही तर विश्वास, माया, प्रेरणा, समर्पण आणि माणुसकीचं जिवंत रूप आहेत. भाऊंना माझ्यातर्फे जन्मदिनाच्या खूप खूप शुभेच्छा!




केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी यांचे स्वागत करताना ज्ञानेश्वर तापकीर व इतर.



मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे योगीराज पतसंस्थेत स्वागत करताना ज्ञानेश्वर तापकीर



महाराष्ट्राचे डॅशिंग नेते अजितदादा पवार यांच्यासोबत ज्ञानेश्वर तापकीर.



ज्येष्ठ शास्त्रज्ञ रघुनाथ माशेलकर यांना चपराकने प्रकाशित केलेले 'आर्यांची दिनचर्या' हे पुस्तक भेट देताना ज्ञानेश्वर तापकीर आणि राजेश विधाते.

# आमचे आधारस्तंभ



भाग्यशाली विजय पठारे
शाखा व्यवस्थापिका, कृष्णानगर, योगीराज नागरी सहकारी पतसंस्था

योगीराज पतसंस्थेची स्थापना होऊन २६/१२/२६ रोजी ३० वर्षे पूर्ण झाली. आमच्या आयुष्यातील खूप महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व म्हणजे आमचे संस्थापक अध्यक्ष श्री. ज्ञानेश्वर केशवराव तापकीर. त्यांची आज खरोखर सर्व रूपरेषा लिहिताना मनस्वी आनंद होतोय की, भाऊंच्याविषयी लिहिताना शब्द अपुरे पडतात. संस्थेत कामाला लागून १९ वर्षे होतील. योगीराज ही नुसती व्यावहारिक कारभार पाहणारी संस्था नसून एक परिवार आहे. हा परिवार फक्त भाऊंमुळे एकत्र आहे.

भाऊंचे समाजातील काम पाहता एक ग्रंथ तयार होईल. भाऊंचा स्वभाव खूप प्रेमळ आणि दयाळू आहे. आज मला एका अशा व्यक्तिबद्दल काही शब्द लिहिण्याची संधी मिळत आहे, ज्यांनी आपल्या आयुष्यात 'माणुसकी' हा शब्द खऱ्या अर्थाने जगून दाखवला आहे. आपल्या सर्वांचे लाडके भाऊ ज्यांनी आयुष्यभर स्वतःपेक्षा इतरांचा विचार केला. गरजुंना मदतीचा हात दिला आणि प्रत्येकांच्या सुख-दुःखात खंबीरपणे उभे राहिले. पतसंस्थेच्या प्रत्येक कर्मचाऱ्याशी अगदी प्रेमाचे नाते. त्यांची विचारपूस करणारे भाऊ सदैव आमच्या पाठीशी उभे राहिले. भाऊ म्हणजे केवळ एक व्यक्ती नाहीत तर आपल्या सर्वांसाठी प्रेरणेचा झरा आहेत. कोणालाही अडचण आली किंवा आधाराची गरज भासली की सर्वप्रथम आठवण येते ती भाऊंची. त्यांनी कधी स्वतःच्या प्रसिद्धीची अपेक्षा ठेवली नाही. भाऊ फक्त आणि फक्त काम करत राहिले. फक्त दुसऱ्यासाठी काय जाणू त्यांचा जन्म झाला असावा! दुसऱ्यांना मदत करत असताना समोरच्याकडून कधीही परतफेडीची अपेक्षा ठेवली नाही. त्यांनी फक्त निःस्वार्थ भावनेने मदत केली. आजच्या काळात स्वतःच्या कामातून वेळ काढून दुसऱ्यासाठी धावून जाणारी माणसं फार कमी दिसतात! पण भाऊंनी आयुष्यभर दुसऱ्यांसाठीच काम केलं. त्यांच्या चेहऱ्यावरचे हसू, मनातील आपुलकी आणि प्रत्येकाला दिलेला सन्मान, हेच त्यांचे खरे मोठेपण आहे.

भाऊ म्हणजे केवळ एक नातं नाही तर संकटात धावून येणारी माउली आहे. संकटात आधार देणारी सावली आहे. जे स्वतःपेक्षा इतरांच्या आनंदाचा विचार जास्त करतात, योग्य मार्ग दाखवतात आणि प्रत्येकालाच धीर देतात. अशा व्यक्तिबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी शब्दच नाहीत. तुमच्या अनुभवाने, प्रेमाने आणि मार्गदर्शनाने अनेकांचे आयुष्य उजळले आहे. तुमच्यासारखी माणसं आज समाजाची खरी ताकद आहे. योगीराजच्या माध्यमातून भाऊंनी गोरगरिबांना जी मदत केली त्यांचे आशीर्वाद भाऊंच्या पाठीशी आहेत. भाऊ गगनगिरी महाराजांचे भक्त आहेत. भाऊ गगनगिरी महाराजांना विचारल्याशिवाय कोणतेही काम करत नाहीत, ही गुरुभक्ती त्यांच्या विचारात दिसते.

**"भक्त ऐसा जाना जो देही उदास**
**गेले आशा पास निवारोणी"**

तुकाराम महाराजांच्या अभंगवाणीप्रमाणे भाऊंना कोणाकडून कसलीही आशा नाही, देणे, देत राहणे हेच त्यांचे काम आहे. श्रीकृष्ण भगवंताप्रमाणे आमचे भाऊ आहेत. केवळ आणि केवळ प्रेम देणे, समाजाची सेवा करणे, मदत करणे जणू त्यांचा त्यासाठीच जन्म घेतला असावा. आज भाऊंच्या वाढदिवसानिमित्त गगनगिरी महाराजांच्या चरणी प्रार्थना करते की, भाऊंना निरोगी आयुष्य मिळो दे! उदंड आयुष्य मिळो दे!



# भाऊ : दूरदृष्टी असणारे व्यक्तिमत्त्व



सीमा अमोल डोके
शाखा व्यवस्थापिका बाणेर

ज्ञानेश्वर केशवराव तापकीर ज्यांना सर्व जण माउली आणि भाऊ याच नावाने ओळखतात. प्रत्यक्षात 'भाऊ' ही उपाधी मिळणे काही सोपे नाही. ते योगीराज पतसंस्थेचे फक्त संस्थापक नसून, ते अनेक गरजवंतांच्या आयुष्यात आशेचा किरण बनलेले प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व आहेत.

आई-वडिलांच्या अथक परिश्रमाचे चीज करून त्यांनी फार कष्टातून आजचा दिवस पाहिलेला आहे. समाजासाठी प्रामाणिकपणे काही तरी करण्याच्या तळमळीतूनच त्यांची नगरसेवक पदाकडे यशस्वी वाटचाल झाली आणि त्यातूनच ते बाणेरचे पहिले नगरसेवकही झाले. त्या काळात त्यांनी असंख्य कुटुंबांना, उद्योजकांना उभारी दिली आणि बाणेरचे नंदनवन केले परंतु नगरसेवक पदावर असताना जेवढे काम करता आले नाही तेवढे काम त्यांनी योगीराज पतसंस्थेच्या स्थापनेतून केले. अनेक गरीब कुटुंबांना मदतीचा हात दिला तर मोठ्या व छोट्या उद्योजकांना त्यांच्या उद्योगात मदत करत त्यांच्या पाठीशी उभे राहिले. या सगळ्याच्या पलीकडे म्हणजे भाऊंचे त्यांच्या कर्मचाऱ्यांवर व संचालक मंडळावर जे प्रेम आणि विश्वास व आदर आहे तो म्हणजे शब्दात व्यक्त न करता येण्यासारखा आहे. कर्मचाऱ्यांच्या प्रत्येक सुखदुःखात भाऊ त्यांच्या पाठीशी असतात कारण ते कर्मचाऱ्यांना फक्त कर्मचारी म्हणून पाहत नाही तर ते त्यांना आपल्या कुटुंबाचा एक भाग मानतात.कर्मचाऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणाची, तब्येतीची, कर्मचाऱ्यांना कमी व्याजदराने कर्ज उपलब्ध करून देण्याची, वेळप्रसंगी त्यांना हक्काची रक्कम दिवाळी ॲडव्हान्स बिनव्याजी देऊन, कर्मचाऱ्यांच्या भविष्याबाबतची त्यांनी दूरदृष्टी ठेवली आहे. त्यामुळेच आज भाऊ हे नाव केवळ एका यशस्वी व्यक्तिचे नाही तर विश्वास, उदारता, माणुसकी आणि समाजसेवेचे प्रतीक बनले आहे. अशा आमच्या भाऊंना वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा आणि देवाच्या चरणी प्रार्थना की असेच निरोगी व आरोग्यदायी आयुष्य त्यांना मिळावे हीच इच्छा.

# साहित्य, संस्कृती आणि माणुसकी जपणारे व्यक्तिमत्त्व



केदार कदम
पत्रकार
८८८८०१५१५३

एखाद्या परिसराचा विकास हा केवळ रस्ते, पाणी, वीज आणि इमारतींच्या उभारणीतून होत नसतो; तर त्या परिसरातील माणसांच्या विचारांमध्ये, संस्कृतीमध्ये आणि संवेदनशीलतेमध्ये होणारी समृद्धी हीदेखील विकासाचीच एक महत्त्वाची बाजू असते. ही जाणीव मनामध्ये बाळगून समाजकारण करणारे लोकप्रतिनिधी फारच दुर्मीळ असतात. बाणेर-बालेवाडी परिसरासाठी असेच एक जिव्हाळ्याचे, साहित्यप्रेमी आणि संस्कृती जपणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे ज्ञानेश्वरभाऊ तापकीर.

योगीराज नागरी पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष आणि माजी नगरसेवक म्हणून त्यांची ओळख सर्वांनाच आहे; मात्र या ओळखीच्या पलीकडे जाऊन त्यांनी आपल्या कार्यातून परिसरामध्ये साहित्य, कला आणि संस्कृतीची बीजे रुजवण्याचे जे कार्य केले, ते आजही अनेकांच्या स्मरणात जिवंत आहे. सन १९९७ मध्ये पुणे महानगरपालिकेमध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या बाणेर-बालेवाडी परिसरामध्ये २००२ च्या निवडणुकांनंतर प्रथम नगरसेवक होण्याचा मान ज्ञानेश्वरभाऊ तापकीर यांना मिळाला. नव्याने विकसित होत असलेल्या या परिसरामध्ये त्यांनी विकासाची सूत्रे हातात घेतली; पण त्यांचा विकासाचा दृष्टिकोन फक्त भौतिक सुविधांपुरता मर्यादित नव्हता. समाजाला विचारांची, साहित्याची आणि संस्कृतीची जोड मिळाली पाहिजे, ही त्यांची भूमिका होती.

याच विचारातून औंध-बाणेर साहित्य संमेलनाची संकल्पना प्रत्यक्षात आली. परिसरातील साहित्यिक, कवी, लेखक आणि कलाप्रेमी नागरिकांना एकत्र आणून साहित्यिक चळवळ उभी करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी केले. कवी संमेलने, साहित्य संमेलने आणि सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून परिसरामध्ये वैचारिक वातावरण निर्माण झाले. नव्या पिढीला साहित्य आणि संस्कृतीची ओळख करून देण्यामध्ये या उपक्रमांचा मोठा वाटा राहिला. 'ज्ञानक्रांती काव्य करंडक' आणि एकांकिका स्पर्धांच्या आयोजनासाठी मदतीचा हात मागितला असता, भाऊंनी कोणताही विलंब न करता दिलेले सहकार्य आजही मनात घर करून आहे. त्यांच्या पाठबळामुळे राज्यभरातील काव्यप्रेमी, कलाकार आणि नाट्यस्पर्धक औंध-बाणेर-पाषाण परिसरामध्ये येऊ लागले. त्या निमित्ताने परिसराची सांस्कृतिक ओळख अधिक व्यापक झाली. साहित्यिक, कवी आणि लेखकांशी आपुलकीने संवाद साधणारे लोकप्रतिनिधी आजच्या काळात फार कमी आढळतात मात्र ज्ञानेश्वरभाऊ हे आपल्या परिसरातील साहित्यिकांशी सतत संपर्क ठेवून त्यांना प्रोत्साहन देताना दिसतात. नवोदित लेखकांची पुस्तके प्रकाशित होणे, दिवाळी अंकांना प्रोत्साहन मिळणे किंवा साहित्यिक कार्यक्रमांना व्यासपीठ मिळणे या सर्व गोष्टींमध्ये भाऊंचा सहभाग नेहमीच जाणवतो. योगीराज नागरी पतसंस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त किंवा विविध सांस्कृतिक कार्यक्रमात त्यांनी अनेक नवोदित लेखकांना, कवींना आणि कलावंतांना सन्मानाने व्यासपीठ उपलब्ध करून दिले. पतसंस्था ही केवळ आर्थिक व्यवहार करणारी संस्था न राहता, सामाजिक आणि सांस्कृतिक चळवळीचे केंद्र बनावी, अशी त्यांची भूमिका अनेकदा दिसून आली. ज्ञानेश्वरभाऊंना भेटल्यानंतर सर्वात प्रथम जाणवते ते म्हणजे त्यांचा जिव्हाळ्याचा स्वभाव. साहित्याशी जोडलेला माणूस संवेदनशील असतो, हे त्यांच्याकडे पाहिल्यावर प्रकर्षाने जाणवते.

प्रगल्भ विचारसरणी, ओघवती संवादशैली आणि उसापेक्षाही गोड भाषा यामुळे अनेक जण मिश्कीलपणे म्हणतात, "भाऊंकडे साखर कारखाना आहे!" आणि खरंच, त्यांच्या सहवासात माणुसकीची गोडी अनुभवायला मिळते. श्री गगनगिरी महाराजांचे भक्त असलेले ज्ञानेश्वरभाऊ तापकीर हे समाजसेवा आणि साहित्यसेवा यांचा सुंदर संगम जपत आहेत. आपल्या कार्यातून त्यांनी केवळ विकासकामे केली नाहीत तर माणसांना माणसांशी जोडण्याचे कार्य केले आहे. साहित्य, संस्कृती आणि आपुलकी यांची परंपरा त्यांच्या माध्यमातून अशीच पुढे चालू राहो, हीच त्यांच्या वाढदिवसानिमित्त सदिच्छा!

# सहकारातून समाजक्रांतिचा मंगलमयी सुपंथ

## योगीराजचा प्रवास आणि ज्ञानेश्वर माउलींच्या विचारांचा वारसा



ॲड. श्रीकांत गोविंद पाटील
संस्थापक अध्यक्ष : श्री स्वामी समर्थ प्रतिष्ठान, औंध, पुणे. ९३७१०२०६३२



'योगीराज'च्या कार्यक्रमात सहभागी झालेले खासदार प्रा. मेधाताई कुलकर्णी, डॉ. प्रकाश आमटे, डॉ. मंदा आमटे आदी मान्यवर.

### सहकाराची अधिष्ठात्री देवी आणि संतांचे विचार

**''जे जे भेटे भूत। ते ते मानिजे भगवंत। हे भक्तीचे लक्षण। जाण पां।।''**

संत ज्ञानेश्वर महाराजांच्या या ओवीतील वैश्विक कल्याणाचा संदेश जेव्हा आधुनिक अर्थकारणाशी जोडला जातो तेव्हा जन्म होतो एका योगीराज संकल्पनेचा.

**एकमेकां साहाय्य करूं, अवघे धरूं सुपंथ**

हा केवळ तुकोबारायांचा अभंग नाही तर तो मानवी संस्कृतीचा, सहजीवनाचा आणि पर्यायाने सहकार चळवळीचा मूळ गाभा आहे. आजच्या चंगळवादी, भांडवलशाही आणि केवळ नफाकेंद्री जगतात, जिथे मानवी मूल्यांचा संकोच होत चालला आहे, तिथे गेली ३० वर्षे आर्थिक शिस्त, पारदर्शकता आणि समाजभानाची त्रिसूत्री जपत योगीराज नागरी सहकारी पतसंस्था एका दीपस्तंभासारखी उभी आहे.


२६ मे २०२६ रोजी या संस्थेचा वर्धापन दिन आणि ४ जून २०२६ रोजी संस्थेचे संस्थापक, बाणेरचे प्रथम नगरसेवक, सामाजिक-आर्थिक-आध्यात्मिक क्षेत्रातील धुरंधर व्यक्तिमत्त्व आदरणीय श्री. ज्ञानेश्वरभाऊ तापकीर यांचा वाढदिवस... हा दुग्धशर्करा योग म्हणजे केवळ दोन तारखांचे दिनदर्शिकेवरील मिलन नाही. हा उत्सव आहे एका तपस्वी नेत्याच्या ध्येयवादाचा, हा सोहळा आहे सामान्य माणसाच्या आर्थिक स्वातंत्र्याचा आणि हा कृतज्ञता सोहळा आहे समाजाचे उत्तरदायित्व स्वीकारून चालणाऱ्या एका अखंड ज्ञानयज्ञाचा!

### योगीराज पतसंस्था - ३० वर्षांची सुवर्ण अक्षरांनी लिहिलेली गाथा

सहकारक्षेत्रात संस्था काढणे सोपे असते पण ती टिकवणे, वाढवणे आणि तिच्यावर लोकांच्या विश्वासाचा कळस चढवणे ही अत्यंत खडतर तपश्चर्या आहे. योगीराज नागरी पतसंस्थेने आपल्या २५ वर्षांच्या प्रवासात अर्थकारणाला परमार्थाची आणि नीतिमत्तेची जोड दिली आहे.

### आर्थिक नियम आणि पारदर्शकतेचा कस

रिझर्व्ह बँकेचे नियम, सहकार खात्याचे कायदे हे केवळ कागदावर पाळायचे नसतात तर ते संस्थेच्या रक्तात भिनवायचे असतात, हे योगीराजने दाखवून दिले. एन.पी.ए.चे प्रमाण नियंत्रणात ठेवणे, सभासदांच्या कष्टाच्या पैशाची सुरक्षितता राखणे आणि चोख हिशोब ठेवणे ही या संस्थेची अंगभूत वैशिष्ट्ये आहेत. अर्थतज्ज्ञांच्या मते, एखादी पतसंस्था जेव्हा २५ वर्षे विनाखंड, विनावाद आणि नफ्यात चालते तेव्हा तिच्या मागे केवळ भांडवल नसते तर नैतिक अधिष्ठान असते.



### सभासदांकडून, सभासदांकरिता : खऱ्या अर्थाने लोकशाही

अब्राहम लिंकन यांनी लोकशाहीची व्याख्या केली होती, ''लोकांचे, लोकांनी, लोकांसाठी चालवलेले राज्य...'' सहकारात ही व्याख्या योगीराजने प्रत्यक्ष जगून दाखवली. इथे आलेला प्रत्येक लहान ठेवीदार, भाजी विक्रेता, मध्यमवर्गीय नोकरदार किंवा महिला उद्योजक हा केवळ एक खातेदार नाही; तो या विशाल योगीराज परिवाराचा सन्माननीय घटक आहे. सभासदांच्या सुख-दुःखात धावून जाणे, त्यांना आर्थिक संकटातून बाहेर काढणे आणि त्यांच्यात बचतीची सवय रुजवणे ही नीतिमत्तेची उत्कृष्ठ संस्कार परंपरा संस्थेने जोपासली आहे.

### तत्त्ववेत्ता समाजसेवक - ज्ञानेश्वरभाऊ तापकीर यांचे बहुआयामी व्यक्तिमत्त्व

या संपूर्ण यज्ञकुंडाचे मुख्य ऋत्विज आहेत श्री. ज्ञानेश्वरभाऊ तापकीर. भाऊंचे नावच ज्ञानेश्वर आहे. ज्याप्रमाणे ज्ञानेश्वर माउलींनी प्राकृतातून ज्ञानेश्वरी लिहून ज्ञानाचे दार सामान्यांसाठी खुले केले, त्याचप्रमाणे ज्ञानेश्वरभाऊंनी आधुनिक अर्थकारणाचे आणि समाजकारणाचे दार बाणेर, पुणे आणि परिसरातील कष्टकऱ्यांसाठी खुले केले. भाऊ हे केवळ एक राजकीय नेते किंवा बँकेचे चेअरमन नाहीत; ते एक तत्त्ववेत्ता आहेत.

## भाऊंच्या व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास करताना आपल्याला पाच प्रमुख आयामांचा वेध घ्यावा लागतो : आध्यात्मिक अधिष्ठान आणि योगीराज महाराजांची भक्ती

भाऊंच्या समाजकारणाचा पाया हा निव्वळ भौतिक नाही, तो पूर्णतः आध्यात्मिक आहे. परमपूज्य योगीराज महाराज यांच्या चरणी असलेली त्यांची निस्सीम भक्ती हेच त्यांच्या ऊर्जेचे मुख्य स्तोत्र आहे. संतांच्या आणि सद्गुरूंच्या विचारांचे हेच संस्कार भाऊंच्या प्रत्येक कृतीत प्रतिबिंबित होतात. म्हणूनच योगीराज हे नाव केवळ नावापुरते नाही तर ते एका निस्सीम भक्तीतून निर्माण झालेल्या पवित्र कर्मयोगाचे प्रतीक आहे. व्यवहारात शुद्धता आणि अंतःकरणात आर्तता असणे, हे सद्गुरूंच्या कृपेनेच भाऊंच्या कार्यपद्धतीत उतरले आहे.

### कष्टाचे विद्यापीठ, त्याग आणि भाऊ पदवीचा सन्मान

ज्ञानेश्वरभाऊंचा प्रवास कोणत्याही सुखवस्तू पार्श्वभूमीतून झालेला नाही. त्यांचे संपूर्ण जीवन हे कष्टाचे विद्यापीठ राहिले आहे. समाजसेवेच्या या अथांग विश्वात त्यांनी स्वतःचा स्वार्थ, वेळ आणि कौटुंबिक सुखाचा त्याग केला. निःस्वार्थ हेतूने प्रेरित होऊन जेव्हा एखादा नेता अहोरात्र कष्ट करतो, तेव्हा समाज त्याला आपल्या डोक्यावर घेतो. भाऊंनी संपूर्ण बाणेर आणि पुणे परिसराचे केवळ नेतृत्व केले नाही तर समाजाचे पालकत्व स्वीकारले. त्यांच्या याच वात्सल्यपूर्ण पालकत्वामुळे, समाजाने अत्यंत अंतःकरणापासून, कृतज्ञतेने त्यांना दिलेली पदवी म्हणजेच सर्वांचे लाडके 'भाऊ!' ही पदवी कोणत्याही निवडणुकीने दिलेली नाही तर ती जनतेच्या हृदयातील प्रेमातून जन्माला आली आहे.

### श्री स्वामी समर्थ औंध पुरस्काराचा सुवर्णगौरव

भाऊंच्या या निःस्वार्थ त्यागाची, समाज विन्मुखतेची आणि सांस्कृतिक-सामाजिक क्षेत्रातील उत्तुंग कामगिरीची दखल घेऊन श्री स्वामी समर्थ प्रतिष्ठान, औंधच्या वतीने त्यांना अत्यंत मानाच्या आणि प्रतिष्ठेच्या 'श्री स्वामी समर्थ औंध पुरस्काराने' सन्मानित करण्यात आले आहे. हा पुरस्कार म्हणजे भाऊंच्या अखंड सेवाव्रताला समाजाने दिलेली एक सात्विक पावती आहे. स्वामींच्या आशीर्वादाने सन्मानित झालेले हे आदरणीय व्यक्तिमत्त्व आज अवघ्या समाजसेवेच्या विश्वात एक आदर्श वस्तुपाठ बनले आहे.

### राजकीय दूरदृष्टी आणि बाणेरचे प्रथम नगरसेवक

बाणेरचा इतिहास जेव्हा जेव्हा लिहिला जाईल तेव्हा प्रथम नगरसेवक म्हणून ज्ञानेश्वरभाऊ तापकीर यांचे नाव सुवर्णअक्षरांनी नोंदवले जाईल. बाणेरच्या परिवर्तनाचा पाया घालण्याचे काम भाऊंनी केले. नगरसेवक म्हणून काम करताना त्यांनी सत्तेला कधीही अहंकाराचे साधन बनू दिले नाही तर तिला सेवेचे माध्यम बनवले. रस्ते, पाणी, वीज या भौतिक विकासासोबतच त्यांनी बाणेरची सांस्कृतिक आणि वैचारिक संस्कृतीही समृद्ध केली.

### आर्थिक तज्ज्ञता आणि मानवी दृष्टिकोनाचा सुरेख संगम

भाऊ हे उपजत अर्थतज्ज्ञ आहेत. जागतिकीकरणाच्या काळात छोट्या पतसंस्था कशा टिकवायच्या, पैशाचे योग्य व्यवस्थापन कसे करायचे आणि व्याजदरांचे संतुलन कसे राखायचे याचे भाऊंचे गणित अचूक आहे. कष्टाच्या विद्यापीठातून त्यांनी मिळवलेले अर्थशास्त्राचे ज्ञान कोणत्याही व्यवस्थापन गुरूपेक्षा कमी नाही.

## कल्पकता ते संवेदनशीलता - भाऊंच्या समाजविधायक कार्याचा सुवर्ण आलेख

ज्ञानेश्वरभाऊ तापकीर यांच्या नेतृत्वाखाली योगीराज पतसंस्थेने केवळ नफा-तोटा पाहिला नाही तर सामाजिक संकटात पान ९ वर ▶▶



**संतोष नौकुडकर**
संचालक
समृद्धी इन्फोटेक क्लासेस

# निश्चयाचा महामेरू...



गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करताना ज्ञानेश्वरभाऊ तापकीर.

आज मला एका अशा व्यक्तिबद्दल लिहिण्याची संधी मिळत आहे ज्यांनी आपल्या आयुष्यात माणुसकी हा शब्द खऱ्या अर्थाने जगून दाखवला आहे. आपल्या सर्वांचे लाडके भाऊ, ज्यांनी आयुष्यभर स्वतःपेक्षा इतरांचा विचार केला, गरजूंना मदतीचा हात दिला आणि प्रत्येकाच्या सुख-दुःखात उभे राहिले.

भाऊ म्हणजे केवळ एक व्यक्ती नाहीत, तर आपल्या सर्वांसाठी प्रेरणेचा झरा आहेत. कोणालाही अडचण आली, दुःख आले किंवा आधाराची गरज भासली की सर्वप्रथम आठवण येते ती भाऊंची. त्यांनी कधी प्रसिद्धीची अपेक्षा ठेवली नाही, कधी पतरफेडीची इच्छा केली नाही; त्यांनी फक्त निस्वार्थ भावनेने मदत केली. आजच्या काळात स्वतःच्या कामातून वेळ काढून दुसऱ्यांसाठी धाऊन जाणारी माणसं फार कमी दिसतात पण भाऊंनी हे आयुष्यभर केलं. त्यांच्या चेहऱ्यावरचं हसू, मनातील आपुलकी आणि प्रत्येकाला दिलेला सन्मान हेच त्यांचं खरं मोठेपण आहे.

भाऊ म्हणजे फक्त नातं नाही तर संकटात आधार देणारी सावली आहे. जे स्वतःपेक्षा इतरांच्या आनंदाचा जास्त विचार करतात, योग्य मार्ग दाखवतात आणि प्रत्येक वेळी धीर देतात, अशा व्यक्तिंबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी शब्दही कमी पडतात.

तुमच्या अनुभवाने, प्रेमाने आणि मार्गदर्शनाने अनेकांचे आयुष्य उजळले आहे. तुमच्यासारखी माणसं समाजाची खरी ताकद असतात. चुकलो तेव्हा समजावलं, अडलो तेव्हा हात दिला आणि यश मिळालं तेव्हा पाठ थोपटली, हेच तुमचं मोठेपण आहे. नेहमी योग्य दिशा दाखवणाऱ्या आणि सर्वांना माणुसकीची शिकवण देणाऱ्या भाऊंप्रति मनःपूर्वक कृतज्ञता आणि आदर.

भाऊंनी आम्हाला शिकवलं की, 'खरी श्रीमंती पैशात नसते, ती माणसं जोडण्यात असते.' त्यांच्या या प्रेमळ स्वभावामुळेच त्यांनी असंख्य लोकांच्या मनात कायमचं स्थान निर्माण केलं आहे. आज भाऊंच्या वाढदिवस प्रसंगी आम्ही सर्व जण त्यांच्याप्रति मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त करतो. भाऊ, तुम्ही दिलेलं प्रेम, आधार आणि संस्कार आमच्यासाठी अमूल्य आहेत. तुमचं आयुष्य निरोगी, आनंदी आणि दीर्घायुषी राहो, हीच इश्वरचरणी प्रार्थना.

शेवटी एवढंच म्हणेन, ज्यांच्या कृतितून माणुसकी दिसते तीच माणसं आयुष्यभर लोकांच्या हृदयात जिवंत राहतात.

# सहकारातून समाजक्रांतिचा मंगलमयी सुपंथ

◀◀ पान ८ वरून

आणि समाजउभारणीत नेहमीच वज्रनिर्धार दाखवला आहे. भाऊंच्या संवेदनशीलतेची आणि समाजविधायक कार्याची प्रचिती देणारी काही ठळक उदाहरणे खालीलप्रमाणे आहेत :

**कृषी संस्कृतीशी घट्ट नातं :** शेतकरीराजाला संकटातून तारणे : सन २००० मध्ये जेव्हा शेतकरी अडचणीत होता तेव्हा 'कांदा साठवा, शेतकरी वाचवा' हा क्रांतिकारी संदेश देत संस्थेने कल्पकता दाखवली. एकाच दिवसात तब्बल ४७ टन कांद्याची थेट विक्री करून शेतकऱ्यांना उभे केले. भाऊंच्या या अनोख्या उपक्रमाची दखल थेट केंद्रीय सहकार सचिव मा. भास्कर वरूआ आणि राज्याचे सहकार आयुक्त सुधीरकुमार गोयल यांनी घेतली, जी सहकार क्षेत्रासाठी भूषणावह गोष्ट आहे.

**बळीराजाला आर्त साद :** निसर्गाच्या कोपामुळे आणि कर्जाच्या विळख्यामुळे आत्महत्याग्रस्त झालेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबांना मायेचा आधार देण्यासाठी भाऊंनी नाम फाउंडेशनला ५ लाख रुपयांचा मदतनिधी देऊन आपली सामाजिक कृतज्ञता व्यक्त केली.

### योगीराजचे कौटुंबिक आणि वात्सल्यपूर्ण पालकत्व

**योगीराज कन्यारत्न विवाह योजना :**

ज्या गरीब मुलीच्या डोक्यावर आई किंवा वडिलांचे छत्र हरवले आहे, अशा अनाथ मुलींच्या विवाहाचा संपूर्ण भार भाऊ स्वतः उचलतात. या योजनेअंतर्गत त्या मुलीला भांड्यांसह संपूर्ण सुखी संसार संस्थेतर्फे भेट दिला जातो, ज्यामुळे एका बापाची माया त्या लेकीला मिळते.

**आरोग्य रक्षण हाच धर्म :** समाजातील गरीब आणि गरजू रुग्णांच्या हृदयाच्या शस्त्रक्रियेसाठी आणि किडनी प्रत्यारोपणासारख्या अत्यंत खर्चिक उपचारांसाठी संस्था नेहमीच आर्थिक मदतीचा हात पुढे करते, ज्यामुळे अनेकांना नवजीवन लाभले आहे.

**शिक्षणाची ज्ञानगंगा आणि गुणवत्तेचा सन्मान**

वंचितांचे उच्च शिक्षण : १२ वी मध्ये ९७% गुण मिळवूनही गरिबीमुळे जिचे शिक्षण थांबणार होते, अशा ऋती चमरे या गुणवंत मुलीच्या उच्च शिक्षणाचा संपूर्ण खर्च योगीराज संस्थेने उचलून तिच्या स्वप्नांना पंख दिले आहेत.

**योगीराज शिष्यवृत्ती :** १० वी च्या परीक्षेत ९०% पेक्षा जास्त गुण मिळवणाऱ्या गरीब व गरजू विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप मारत त्यांना योगीराज शिष्यवृत्ती देऊन भाऊ पुढील शिक्षणासाठी प्रोत्साहित करतात.



**महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात सामाजिक व सांस्कृतिक संवर्धन**

**लोकबिरादरी प्रकल्पास मदत :** गडचिरोलीच्या भामरागडसारख्या दुर्गम भागात आदिवासींच्या सेवेचे व्रत घेतलेल्या हेमलकसा येथील डॉ. प्रकाश बाबा आमटे यांच्या लोकबिरादरी प्रकल्पाला १० लाख रुपयांचे चारचाकी वाहन भेट देऊन भाऊंनी दळणवळणाची मोठी अडचण दूर केली.

**जलसंधारण व साहसाला बळ**

जलसंधारणाच्या पवित्र कामासाठी चुंब गावाला ५० हजार रुपयांची मदत संस्थेने केली तसेच पिंपरी चिंचवड माऊंटेनिअरिंग क्लबला त्यांच्या धाडसी एल्बुस मोहीमेकरीता आर्थिक बळ दिले.

**दिव्यांग आणि वंचितांना सन्मान :** समाजात दुर्लक्षित राहिलेल्या अखिल भारतीय दिव्यांगांच्या साहित्य संमेलनाला आर्थिक मदत देऊन त्यांनी साहित्याचा सन्मान केला तसेच औसा तालुक्यातील एड्सग्रस्त मुलांच्या पुनर्वसनासाठी अहोरात्र काम करणाऱ्या सेवालय संस्थेस ५ लाख रुपयांची भरीव मदत करून भाऊंनी मानवी मूल्यांची जपणूक केली.

**आध्यात्मिक संवर्धन (भंडारा डोंगर) :** संतांचे विचार हेच आपल्या संस्कृतीचे प्राण आहेत. म्हणूनच भंडारा डोंगरावर उभारण्यात येत असलेल्या १२५ कोटी रुपयांच्या जगद्गुरू तुकाराम महाराजांच्या भव्य मंदिरासाठी संस्थेने स्वतःचे १० लाख रुपये आणि इतर दानशूरांकडून ९० लाख रुपये असे एकूण १ कोटी रुपयांचे देणगी योगदान मिळवून दिले, जे भाऊंच्या अलौकिक आध्यात्मिक भक्तीचे द्योतक आहे.

**एकमेकां साहाय्य करूं... सहकारातील नवा सुपंथ**

पतसंस्थेच्या माध्यमातून भाऊंनी केवळ पैशांची देवाणघेवाण केली नाही तर खऱ्या सहकार्याचा समाज निर्माण केला. भाऊंनी या संस्थेच्या माध्यमातून समाजातील शेवटच्या घटकाला मुख्य प्रवाहात आणले. ज्यांना मोठ्या बँका उभ्या करत नाहीत, अशा छोट्या व्यावसायिकांना योगीराजने आर्थिक आधार देऊन पायावर उभे केले. हाच खरा सुपंथ आहे.

**पारंपरिक बँकिंग : योगीराजचे सहकार तत्त्वज्ञान :**

- उद्दिष्ट नफा कमावणे नाही तर सभासदांचा सर्वांगीण विकास करणे.
- दृष्टिकोन केवळ कागदपत्रे आणि क्रेडिट स्कोअर नाही तर मानवी संबंध, त्याग आणि विश्वास वृद्धी.
- कौटुंबिक आणि आत्मीयतेची कार्यपद्धती.
- सामाजिक सहभाग मर्यादित/नावापुरता. शिक्षण, आरोग्य, आपत्ती आणि दुर्गम भागात थेट सहभाग.

**कृतज्ञता पर्व – वर्धापन दिन आणि वाढदिवसाचा सुवर्णक्षण**

२६ मे २०२६ हा योगीराज पतसंस्थेचा वर्धापन दिन आहे. हा दिवस म्हणजे संस्थेच्या यशाचा आलेख उंचावत नेणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांच्या कष्टाचा, संचालकांच्या दूरदृष्टीचा आणि सभासदांच्या अढळ विश्वासाचा गौरव आहे. त्यापाठोपाठ ४ जून २०२६ रोजी श्री. ज्ञानेश्वरभाऊ तापकीर यांचा वाढदिवस येत आहे. भाऊंचे जीवन म्हणजे एक खुलं पुस्तक आहे. ज्यांच्या आयुष्यात त्यांनी प्रकाशाचा किरण पोहचवला त्या हजारो कुटुंबांच्या हृदयाच्या सिंहासनावर भाऊ विराजमान आहेत. भाऊंचा वाढदिवस साजरा करणे म्हणजे एका व्यक्तिचा सत्कार करणे नव्हे तर त्यांनी आयुष्यभर जपलेल्या मूल्यांचा, नीतिमत्तेचा आणि कर्तव्यभावनेचा सत्कार करणे होय.

**अखंड चालणारा लोककल्याणाचा रथ**

ज्ञानेश्वरभाऊ तापकीर यांच्यासारखे उत्तुंग नेतृत्व समाजाला लाभणे हे बाणेरकरांचे आणि संपूर्ण सहकार क्षेत्राचे भाग्य आहे. त्यांनी आपल्या कार्यातून सिद्ध केले आहे की, राजकारण आणि अर्थकारण जर आध्यात्माच्या, गुरूभक्तीच्या आणि समाजभानाच्या अधिष्ठानावर चालवले तर एक आदर्श समाज निर्माण होऊ शकतो.

### योगीराज ना. सह. पतसंस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त आणि आदरणीय ज्ञानेश्वरभाऊ तापकीर यांच्या जन्म दिनानिमित्त त्यांच्या चरणी प्रार्थना :

भाऊ, आपले हे समाजविधायक कार्य, हा आर्थिक ज्ञानयज्ञ असाच अविरत चालत राहो. आपल्या मार्गदर्शनाने सहकाराचा हा सुपंथ अधिक प्रशस्त होवो. आपल्याला उदंड, निरोगी आणि यशस्वी आयुष्य लाभो! योगीराज पतसंस्थेस यशस्वी वाटचालीबद्दल आणि संस्थापक श्री. ज्ञानेश्वरभाऊ तापकीर यांना वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा!

(हा लेख म्हणजे केवळ शब्दांचा संग्रह नाही तर तो श्री स्वामी समर्थ प्रतिष्ठानच्या वतीने भाऊंच्या लोकोत्तर आणि निःस्वार्थ कार्याच्या चरणी अर्पण केलेली एक कृतज्ञतेची समिधा आहे.) ■■

च प श क चपराक प्रकाशन www.chaprak.com

# ‘चपराक प्रकाशन’ची दर्जेदार पुस्तके

ही पुस्तके घरपोच मागविण्यासाठी


संपर्क - ७०५७२९२०९२/८७६७९४१८५०

ग्रंथसूचीसाठी स्कॅन करा


## कथासंग्रह

| | | | |
|---|---|---|---|
| १ | आनंद पहाट | संजय बांधवकर | १२५ |
| २ | आभास | सौ. शिल्पा जैन | २०० |
| ३ | एमरल्ड ग्रीन | समीर नेर्लेकर | ७५ |
| ४ | कस्तुरीगंध | प्रा. बी. एन. चौधरी | ३५० |
| ५ | सावट | काशिनाथ माटल | २५० |
| ६ | पंधरा त्रिक पंचेचाळीस | समीर नेर्लेकर | ५० |
| ७ | पाठलाग | चंद्रलेखा बेलसरे | २५० |
| ८ | प्रतिशोध | चंद्रलेखा बेलसरे | ३५० |
| ९ | बाईचा दगड | डॉ. भास्कर बडे | १७० |
| १० | बारा सोनेरी पाने आणि डोंगरावरच्या कथा | जे. डी. पराडकर | २५० |
| ११ | भोंगळा पाऊस | जयदीप विघ्ने | २५० |
| १२ | मृत्युपश्चात | चंद्रलेखा बेलसरे | ३०० |
| १३ | व्यथिता | जयश्री सोन्नेकर | १२० |
| १४ | सत्याभास | चंद्रलेखा बेलसरे | ३०० |
| १५ | सारांश कथा | व्यंकटेश कल्याणकर | ५० |
| १६ | हजार धागे सुखाचे | किरण सोनार | १३० |
| १७ | हॅप्पी रिटर्न्स | सदानंद भणगे | १५० |
| १८ | चरैवेति | सयाजी शिंदे | २५० |
| १९ | ओव्हरटेक | चंद्रलेखा बेलसरे | ३०० |
| २० | कडेवर आणि इतर कथा | महेश सोवनी | ३५० |
| २१ | अनुभवाचे अंतरंग | अशोक शेटे | १५० |





## कादंबरी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अनोख्या रेशीमगाठी | रवींद्र कामठे | ३०० |
| २ | अमानवी विनवणी | सदानंद भणगे | २०० |
| ३ | इस्लाम खतरे में है | निसार शेख | २०० |
| ४ | काळीजकाटा | सुनील जवंजाळ | १५० |
| ५ | कॉलेज गेट | सागर कळसाईत | ३५० |
| ६ | टर्मिनस व्हिक्टोरिया | रमेश गोविंद वैद्य | १२० |
| ७ | तीर्थरूप – वनवासी जीवनाची गोष्ट | संजय गोराडे | २५० |
| ८ | मोरूनामा | विजय तरवडे | १०० |
| ९ | राजस भाग्य | सुनील पवार | २५० |
| १० | चौथा मजला | कस्तुरी देवरुखकर | २०० |
| ११ | परिसस्पर्श | सयाजी शिंदे | २५० |
| १२ | चौथा मजला | कस्तुरी देवरुखकर | २०० |






## ललित, वैचारिक

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अंतरीचे रंग | सौ. सुरेखा अशोक बोऱ्हाडे | २०० |
| २ | अक्षरयात्रा | जे. डी. पराडकर | ४०० |
| ३ | आई | द. गो. शिर्के | १३० |
| ४ | चैतन्य पालवी | डॉ. रामचंद्र देखणे | ३५० |
| ५ | थोडं मनातलं | विनोद श्रा. पंचभाई | १२० |
| ६ | दरवळ | घनश्याम पाटील | २५० |
| ७ | प्रभातरंग | रवींद्र खंदारे | ३०० |
| ८ | मनापासून | डॉ. राजेंद्र माने | २०० |
| ९ | माझी साप्ताहिकी | ॲड. प्रभाकर येरोळकर | ३०० |
| १० | वाटेवरच्या मशाली | सुजाता पुरी | २५० |
| ११ | विज्ञानमूर्ती ज्ञानोबा-तुकोबा | दत्तात्रेय गायकवाड | १०० |
| १२ | वेध अंतर्मनाचा | जे. डी. पराडकर | २५० |
| १३ | शब्दसुरांच्या हिंदोळ्यावर | सुनील शिनखेडे | १२० |
| १४ | सर्जक | मयूर बागुल | २५० |
| १५ | साद निसर्गाची | जे. डी. पराडकर | २५० |
| १६ | हळवा कोपरा | जे. डी. पराडकर | २५० |
| १७ | काळीज गोंदण | किरण लोखंडे | २०० |
| १८ | आनंदझरा | शिरीष चिटणीस | ३०० |
| १९ | चंद्रचाहूल | मनीषा कुलकर्णी आष्टीकर | २५० |
| २० | फुलदाणी | जे. डी. पराडकर | २५० |
| २१ | मंतरलेले दिवस | जे. डी. पराडकर | २५० |
| २२ | उजेडाच्या वाटा | संदीप वाकचौरे | ३०० |








## शिक्षणशास्त्र



| | | | |
|---|---|---|---|
| १ | ऐसपैस शिक्षण | संदीप वाकचौरे | २५० |
| २ | परिवर्तनाची वाट | संदीप वाकचौरे | २५० |
| ३ | पाटी पेन्सिल | संदीप वाकचौरे | २५० |
| ४ | विनोबांची शिक्षणछाया | संदीप वाकचौरे | २५० |
| ५ | शिक्षणनामा | संदीप वाकचौरे | ३०० |
| ६ | शिक्षणाचिये द्वारी | संदीप वाकचौरे | ३०० |
| ७ | शिक्षणाचे दिवास्वप्न | संदीप वाकचौरे | २५० |
| ८ | शिक्षणाचे पसायदान | संदीप वाकचौरे | २५० |
| ९ | शिक्षणाचे प्रश्नोपनिषद | संदीप वाकचौरे | ३०० |
| १० | शिक्षणावर बोलू काही | संदीप वाकचौरे | ३०० |
| ११ | शोध शिक्षणाचा | संदीप वाकचौरे | २५० |
| १२ | सृजनाची वाट | संदीप वाकचौरे | २५० |
| १३ | भाषा आणि शिक्षण | संदीप वाकचौरे | ३०० |
| १४ | शिक्षणरंग | संदीप वाकचौरे | ३५० |
| १५ | आजचे शिक्षणयात्री | कैलास दौंड | ३५० |







## चरित्र, आत्मचरित्र, व्यक्तिचित्रण

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री छत्रपती शिवाजी महाराज चरित्र | रमेश शिंदे | ५०० |
| २ | अग्निदिव्य | आशिष निनगुरकर | २०० |
| ३ | एकनाथजी रानडे : जीवन आणि कार्य | सागर सुरवसे | ७५ |
| ४ | धरणगाथा | मंजिरी कुलकर्णी-एरंडे | १०० |
| ५ | ओड आणि ओढ | डॉ. लक्ष्मणराव देगलूरकर | ४०० |
| ६ | गवसणी | मनोहर इनामदार | २५० |
| ७ | गावकुसातलं सोनं | किरण भावसार | १५० |
| ८ | चिन्नण्णा | हरालाल पगडाल | ४०० |
| ९ | देदीप्यमान शलाका | सुरेखा बोऱ्हाडे | ४०० |
| १० | देवकीनंदन | नरहरी पत्तेवार | ४०० |
| ११ | पाळंमुळं | नानासाहेब खर्डे | ४०० |
| १२ | भरारी एका ‘आशा’वादी खेळाडूची | आशा दत्ताजी शिंदे | २०० |
| १३ | लोकनायक सयाजीराव गायकवाड (ब्रेल) | सौ. चंद्रलेखा बेलसरे | ४८० |
| १४ | शहिद | सुभाष धुमे | ११० |
| १५ | शांतीदूत लालबहादूर शास्त्री | प्रभाकर तुंगार | ५० |
| १६ | संघर्ष हेच सामर्थ्य | रवींद्र खंदारे | ४०० |
| १७ | दिले घेतले | आशा पैठणे | ४०० |
| १८ | असं जगावं कधीतरी | जे. डी. पराडकर | २५० |
| १९ | कसबा डायरी | जे. डी. पराडकर | २५० |
| २० | गंध माणसांचा | संजय वाघ | १३० |
| २१ | प्राजक्ताचे सडे | जे. डी. पराडकर | २५० |



| | | | |
|---|---|---|---|
| २२ | बाईची भाईगिरी | सुरेख बोऱ्हाडे | १५० |
| २३ | मोहरे झेला पडले | अनंत घोगले | ८० |
| २४. | कोकणची माणकं | जे. डी. पराडकर | २५० |
| २५. | कोवळी सकाळ | श्रीराम नानल | १७५ |



## गौरवग्रंथ / स्मृतिग्रंथ

| | | | |
|---|---|---|---|
| १ | राहुलखुणा | विजया राहुल पाटील | ३५० |
| २ | आठवणीतले आबासाहेब | संदीप वाकचौरे | ३५० |
| ३ | स्वरचंद्रिका | संगीता गोडबोले, आश्लेषा महाजन | ४५० |
| ४ | सुभाव भजन | घनश्याम पाटील | ३५० |



## अनुभवकथन

| | | | |
|---|---|---|---|
| १ | रॅगिंगचे दिवस | सुहास कोळेकर | २५० |
| २ | अरे सरकार सरकार | गिरीश गोखले | २५० |
| ३ | एफ.टी.आय.आय. मधील भारावलेले दिवस | डॉ. चंद्रशेखर जोशी | २५० |
| ४ | झुंज कॅन्सरशी | प्रल्हाद दुधाळ | १५० |




## प्रवासवर्णन

| | | | |
|---|---|---|---|
| १ | सांकव | डॉ. संजय जगताप | ३०० |
| २ | माझं महाबळेश्वर | अनिल साळुंके | २५० |
| ३ | पुन्हा एकदा लंडन | हिरालाल पगडाल | १५० |
| ४ | अमेरिकेच्या अंतरंगात | श्रीराम नानल | ३०० |
| ५ | परदेशातल्या पाऊलखुणा | अनिल दातीर | ३५० |




## आरोग्यविषयक, दिनचर्या

| | | | |
|---|---|---|---|
| १ | आरोग्यतरंग | वैद्य ज्योति शिरोडकर | २५० |
| २ | शरीर एक जादूगार | राजेंद्र देशपांडे | २५० |
| ३ | १०१ बीमारियां, योग और प्राकृतिक चिकित्सा | डॉ. राजेंद्र वामन | ४०० |



## नाटके

| | | | |
|---|---|---|---|
| १ | चक्र व इतर नाटके | डॉ. सोमनाथ मुटकुळे | २०० |
| २ | निवडुंग व इतर नाटके | डॉ. सोमनाथ मुटकुळे | २५० |
| ३ | राजर्षी व इतर नाटके | डॉ. सोमनाथ मुटकुळे | ३५० |
| ४ | पाषाणगंध | सदानंद भणगे | ५० |




## राजकीय

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अर्धशतकातला अधांतर | भाऊ तोरसेकर | १०० |
| २ | धडक बेधडक | घनश्याम पाटील | ३०० |



## इतर महत्त्वाची पुस्तके

| | | | |
|---|---|---|---|
| १ | ऋतुरंग | जे. डी. पराडकर | ३५० |
| २ | गुर्रर आणि म्यांव (विनोदी) | आनंद देशपांडे | ३०० |
| ३ | तपोभूमी नाशिक (नाशिक परिचय) | रमेश पडवळ | २३० |
| ४ | विनोदाचा व्हेंटिलेटर | आनंद देशपांडे | २०० |
| ५ | शाब्बास गुरुजी | राजेंद्र दिघे | १७६ |
| ६ | शिवगोरक्षयोग (नाथ संप्रदाय) | उपेंद्रदादा धोंडे | १५० |
| ७ | कुंकू ते दुनियादारी (चित्रपटविषयक) | डॉ. राजेंद्र थोरात | २५० |
| ८ | रोखठोक मनातलं | राजेंद्र बोबडे | २५० |
| ९ | गावची जत्रा भानगडी सतरा | डॉ. राजेंद्र माने | २५० |
| १० | क्रिकेट आणि लाईफ मॅनेजमेंट | डॉ. गिरीश पाटील | १७५ |
| ११ | पत्रास कारण की | संदीप वाकचौरे | २५० |





| | | | |
|---|---|---|---|
| १२ | पुस्तकानुभव | प्रा. दिलीप फडके | ३०० |
| १३ | हास्यरंग | सुनील भातंब्रेकर | १७५ |




## रसग्रहण

| | | | |
|---|---|---|---|
| १ | शब्दसुरांच्या हिंदोळ्यावर | सुनील शिनखेडे | १२० |
| २ | प्रवास कवितेचा | रवींद्र कामठे | २५० |
| ३ | अविट गाणी | श्रीराम ग. पचिंद्रे | २०० |





## पॉकेटबुक

| | | | |
|---|---|---|---|
| १ | वाट इतकी सरळ (ग्राफिटी) | श्रीराम ग. पचिंद्रे | ५० |
| २ | वाटले मला जे (चारोळी) | डॉ. शकुंतला काळे-गावडे | ८० |
| ३ | उमेद (चारोळी) | मलेका शेख-सैय्यद | ८० |
| ४ | What I Realized | Dr. Shankuntala kale-Gawade | १०० |

## कवितासंग्रह

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अंतहीन | चंद्रलेखा बेलसरे | ८० |
| २ | अनिमा अनिमस | कृपेश महाजन | ११० |
| ३ | अम्मी-अब्बूच्या कविता | जावेद शेख | १३० |
| ४ | अवचिता परिमळु | डॉ. मेधा गोसावी-कुलकर्णी | २५० |
| ५ | आगंतुकाची स्वगते | डॉ. कैलास दौंड | ११० |
| ६ | आतला आवाज | विनोद खटके | १५० |
| ७ | गुलमोहराचं कुकू | प्रशांत केंदळे | १२० |
| ८ | चंद्र माझ्या चांदण्यात | डॉ. मेधा गोसावी | १३० |
| ९ | ते दिवस आठवून बघ | डॉ. अशोक शिंदे | १४० |
| १० | परिणीता | डॉ. बी. व्ही. कुलकर्णी | १५० |
| ११ | प्रांजळ | रवींद्र कामठे | १०० |
| १२ | बोलावं म्हणतेय... | ज्योती भारती | १२० |
| १३ | सोनचाफा | अनंत घोगले | १५० |
| १४ | हे रामा | अनंत कराड | १५० |
| १५ | तू नसताना | डॉ. श्रीकांत तारे | २५० |
| १६ | क्षण भाग्याचे | प्रमोद गोलांडे | १५० |








## बालसाहित्य, कुमारसाहित्य

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अक्षर अक्षर शिकूया | मलेका महेबूब शेख सैय्यद | १५० |
| २ | खारुताईचे जंगल आणि इतर गोष्टी | डॉ. कैलास दौंड | १०० |
| ३ | गढीचं गूढ | सुभाषचंद्र वैष्णव | ४० |
| ४ | चरित्र स्मरण | भगवान अंजनीकर | २०० |
| ५ | चार शिलेदार | सुभाष कुदळे | ६० |
| ६ | टण टणा टण | एम. के. गोंधळी | १५० |
| ७ | थांब ना रे ढगोबा | राजेंद्र उगले | १५० |
| ८ | पवनपुत्र हनुमान | नागेश शेवाळकर | २५० |
| ९ | पाखरांची गाणी | राजेंद्र दिघे | १०० |
| १० | बारीकसारीक गोष्टी | शिरीष देशमुख | १२० |
| ११ | रत्नजडित खंजिराचे रहस्य | संजय सोनवणी | १०० |
| १२ | समूदादा | नागेश शेवाळकर | १४० |
| १३ | साहसी लीना | प्रा. डॉ. राहुल पाटील | ८० |
| १४ | हेच खरे जगज्जेते | विनोद पंचभाई | १५० |
| १५ | Fun Wun | सखी-दीपाली जोगदंड | १५० |
| १६ | गप्पी गप्पा आणि इतर कथा | आश्लेषा महाजन | २०० |
| १७ | Unstoppable Tara | ज्योती घनश्याम | २०० |
| १८ | विसाकी ओकिनावा | ज्योती घनश्याम | २०० |
| १९ | पिंपळपान | डॉ. शकुंतला काळे-गावडे | १०० |
| २० | आजी आजोबांच्या गोष्टी | जे. डी. पराडकर | २०० |
| २१ | फुलताना | भरत पाटील | २५० |
| २२ | मोहिम मैत्री | सदानंद भणगे | २०० |
| २३ | चिवचिव चिमणी | डॉ. मा. ग. गुरव | २५० |
| २४ | हत्तीदादा | मलेका माहेबूब शेख-सैय्यद | २२५ |
| २५ | कथा राष्ट्रीय मूल्यांच्या | डॉ. संजय जगताप | २०० |





प्रति,

सोमवार, दि. १ ते ७ जून २०२६

साप्ताहिक चपराक www.chaprak.com

RNI No. MAHMAR/2011/35979



'चपराक' आणि 'लाडोबा' प्रकाशनची पुस्तके घरपोच मागविण्यासाठी हा क्यूआरकोड स्कॅन करा

संपर्क : ७०५७२९२०९२





प्राचार्य डॉ. मुकुंदराव तापकीर

माजी प्रदेशाध्यक्ष, सहकार भारती. ९८२२०२०३३९


# सामाजिक कार्याची गंगोत्री

**आमच्या तापकीर घराण्याचा वारसा जपणारे आमचे ज्ञानेश्वरभाऊ तापकीर यांचा वाढदिवस आमच्यासाठी आणि त्यांचे मित्र, सहकारी यांच्यासाठीही एक आनंदाचा क्षण आहे. त्यांनी एका सामान्य शेतकरी कुटुंबातून येऊन आपल्या जीवनाची यशस्वी वाटचाल केली. शालेय जीवनातच त्यांनी सामाजिक नेतृत्वाचे गुण विकसित केले आणि पुढे आपल्या अनुभवाच्या जोरावर जीवनाच्या विविध क्षेत्रात उत्तमरित्या काम करून आपला समाज अधिक संपन्न करण्याचा प्रयत्न केला. भाऊंचे शिक्षण त्या काळातील सामाजिक परिस्थितीमुळे होऊ शकले नाही पण आपल्या अंगभूत सामाजिक कार्याच्या आवडीतून त्यांनी अनेक कार्यात यशस्वीरित्या भाग घेतला.**

ज्ञानेश्वरभाऊंचे विशेष म्हणजे इतक्या कार्यात मग्न असताना सुद्धा एक भूमिपुत्र या नात्याने त्यांचे शेतीवर जीवापाड प्रेम आहे. त्यामुळे एक उत्तम शेतकरी आणि सामाजिक कार्यकर्ता अशी त्यांची दुहेरी ओळख पुणे शहराला झाली. त्यांनी आधुनिक शेती तंत्रज्ञान विकसित केले आहे. त्यामुळे आपल्या शेतात त्यांचे विविध प्रयोग चालू असतात. सुरुवातीला आर्थिक परिस्थितीमुळे भाऊंना नोकरीची आवश्यकता होती. त्यामुळे त्यांनी महानगरपालिकेत नोकरी केली. आपल्या नोकरीच्या काळात त्यांनी त्यांच्या अधिकाऱ्यांच्या सूचनेप्रमाणे उत्तमरित्या काम करून शाबासकी मिळवली. आपली परिस्थिती सुधारल्यावर त्यांनी महानगरपालिकेतील नोकरीतून निवृत्ती घेतली. तिथेही त्यांचे प्रेमाचे जाळे त्यांनी विकसित केले. बाणेर गावचा महापालिकेत समावेश होण्याचा निर्णय झाला. या परिसरासाठी प्रथमच नगरसेवकपद महानगरपालिकेने निर्माण केले. 'आपणच नगरसेवक व्हावे' अशी अनेकांची स्वप्ने असतातच परंतु ज्ञानेश्वरभाऊंनी आपल्या प्रेमळ स्वभावामुळे आणि व्यापक जनसंपर्कामुळे प्रथम नगरसेवक होण्याचा मान मिळवला. ज्या महापालिकेत नोकरी केली त्याच महापालिकेत एक सन्माननीय नगरसेवक म्हणून ज्ञानेश्वरभाऊंनी प्रवेश केला. आपल्या पाच वर्षाच्या मर्यादित कालावधीमध्ये बाणेर परिसराचा मोठा बदल करून नागरिकांना हवे असणारे रस्ते, पाणी, दळणवळणाच्या सोयी, महापालिकेतील योजना आणल्या. अथक प्रयत्नातून त्या समाजापर्यंत पोहोचविल्या. एक उत्तम नगरसेवक म्हणून त्यांनी आपली कारकीर्द यशस्वी केली.

ज्ञानेश्वरभाऊंच्या जीवनात अजून एक अपूर्व योग आला. त्यांचा धार्मिक, आध्यात्मिक पिंड असल्यामुळे कोणत्याही कार्याला भगवंताचे अधिष्ठान लागते यावर त्यांची नितांत श्रद्धा आहे. त्यांच्या जीवनातील अपूर्व योग म्हणजे ब्रह्मभूत सद्गुरु गगनगिरी महाराज त्यांच्या संपर्कात आले. एवढेच नव्हे तर त्यांना त्यांचा सहवास लाभला. त्यांची महाराजांवर गाढ श्रद्धा आहे. सद्गुरु गगनगिरी महाराज यांनी संपर्कात आलेल्या भक्तांना आध्यात्माच्या वाटा दाखवल्या. त्याचबरोबर सामाजिक कार्याची प्रेरणा देखील महाराजांनी दिली. वीस-पंचवीस वर्षांपूर्वी भाऊंच्या लक्षात आले की आपल्या भोवतालच्या समाजामध्ये लोकांना आर्थिक संघर्ष करावा लागतो. त्यांच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी आपण काही तरी करावे या अस्वस्थ जाणीवेमुळे भाऊंनी आपल्या सहकाऱ्यांशी प्रदीर्घ चर्चा केली आणि यातून आपल्या भागातील नागरिकांच्या आर्थिक गरजा भागवण्यासाठी एखादी पतसंस्था काढावी, असा निर्णय घेतला. एकमेकांचे अतिशय प्रेमाचे संबंध असल्यामुळे या सर्व मित्रांनी पतसंस्था स्थापन करण्याचे स्वप्न पूर्ण केले आणि पतसंस्था स्थापन करण्यासाठी उद्घाटक म्हणून सद्गुरु गगनगिरी महाराज यांना निमंत्रित केले. त्यांच्या पवित्र उपस्थितीत बाणेर भागातील आद्य सहकारी पतसंस्था सुरू झाली. योगीराज पतसंस्था ही केवळ आर्थिक संस्था नाही तर विविध सामाजिक कार्याची गंगोत्री ठरली आहे. संचालक मंडळाने कधी आपल्या आर्थिक स्वार्थाचा विचार केला नाही. 'समाजाचे घेतो तर समाजाला दिले पाहिजे' या भावनेने ही पतसंस्था केली ३० वर्ष केवळ पुणे जिल्ह्यात नाही तर महाराष्ट्रातील एक नामवंत पतसंस्था म्हणून नावारूपाला आली आहे. योगीराज पतसंस्थेने उत्तमरित्या कार्य केल्यामुळे संस्थेला कायमच अ दर्जा मिळालेला आहे. त्याहीपेक्षा विविध सामाजिक उपक्रमांना चालना देणारी ओळख आहे. मिळालेल्या नफ्यातून या पतसंस्थेने अनेकांचे संसार उभे केले आहेत.

अनेक गरीब, होतकरू मुलांना पुढील शिक्षणासाठी स्कॉलरशिप देऊन त्यांच्या उच्च शिक्षणाचा मार्ग प्रशस्त केला आहे. अशा अगणित सामाजिक कार्यात योगीराज पतसंस्था कायमच अग्रेसर राहिली आहे. त्याचे श्रेय या पतसंस्थेचे सर्व संचालक यांना जाते. अनेक राज्यस्तरीय आणि राष्ट्रीय पातळीवर योगीराज पतसंस्थेला अनेक पुरस्कार मिळाले आहेत, ही आम्हा सर्वांच्या दृष्टीने अभिमानास्पद गोष्ट आहे. त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांना शुभेच्छा! आमच्या ज्ञानेश्वरभाऊंना निरामय आयुष्य आणि संपन्न आयुष्य मिळो यासाठी भगवंताकडे प्रार्थना!!